बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बीड | रविवार,दि.२५ऑगस्ट २०२४ | वर्षे४रे | अंक२४वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## नव्या पेन्शन योजनेला मंजुरी!

दिल्ली: केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांसाठी मोदी सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने नव्या पेन्शन योजनेची घोषणा केली असून या योजनेला आज केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. यूनिफाइड पेन्शन स्कीम असं या योजनेचं नाव आहे. या योजनेंतर्गत सरकारी कर्मचाऱ्यांना निवृत्तीपूर्वीच्या शेवटच्या वर्षातील वेतनाच्या किमान ५० टक्के रक्कम पेन्शन म्हणून दिली जाणार आहे. या योजनेमुळे जवळपास २३ लाख कर्मचाऱ्यांना फायदा होणार असल्याचे सांगितले जात आहे.खरं तर मागच्या काही वर्षांपासून सरकारी कर्मचाऱ्यांकडून सातत्याने पेन्शन योजनेत सुधारणा करण्याची मागणी करण्यात येत होती. त्यानुसार मोदी सरकारने नव्या पेन्शन योजनेसाठी डॉ. सोमनाथ यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती.

# आम्ही पोटतिडकीने लढतो आहोत; आम्हाला कमजोर समजू नका:हाके

### पत्रकार परिषद : लक्ष्मण हाके म्हणाले भूमिका स्पष्ट करणाऱ्यांना सपोर्ट






**मनोज जरांगे बेवडा त्याचा आदर आम्ही का करायचा**

मनोज जरांगे हा माणूस काही संत–महंत नाही, किंवा विचारवंत नाही. तो एक बेवडा असून आम्ही त्याचा आदर कशामुळे करायचा. अशी सणसणीत टीका ओबीसी आरक्षण बचाओ आंदोलन नेते नवनाथ वाघमारे यांनी केली.जरांगे नावाच्या व्यक्ती इतर लोकांना एकेरी शब्द, अर्वाचे भाषा वापरतो, अशा व्यक्तीला त्याच भाषेत बोलले पाहिजे.जसे त्याचे वर्तन आहे. खरंतर मनोज जरांगे लढत असलेला लढा प्रस्थापित मराठ्यांचा आहे, गरीब मराठ्यांचा नाही. जर तसा असता तर साबळे नावाच्या व्यक्तीला जालना लोकसभेची उमेदवारी दिली असती. त्यामुळे जरांगे बोलतो तसा नाही. त्याचे दाखवायचे दात वेगळे आणि खायचे दात वेगळे आहेत. अशी टीका नवनाथ वाघमारे यांनी केली.

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

ओबीसींचे आरक्षण वाचविण्यासाठी आमची लढाई आहे.आजपर्यंत ओबीसींचा फक्त वापर झाला.त्यामुळे त्याच्या पदरात काहीच पडले नाही.आम्ही सामान्य कुटुंबातली पोर आहोत, अतिशय प्रामाणिक आणि पोटतिडकीने ओबीसी आरक्षणाचा लढा लढतो आहोत. आम्हाला कमजोर समजू नका, येत्या विधानसभेत कळेल ओबीसींची काय ताकद आहे. ओबीसी मताच्या जीवावर उभा राहिलेली घराणेशाही आता फार काळ टिकणार नाही. राज्यातला जो पक्ष ओबीसी आरक्षणाची बाजू मांडेल त्याला आमचा सपोर्ट राहील. अशी भूमिका ओबीसी आरक्षण बचाओ आंदोलनाचे नेते प्रा.लक्ष्मण हाके यांनी स्पष्ट केली.

ओबीसी आरक्षणाचे नेते प्रा.लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे यांचा महाराष्ट्रात ओबीसी आरक्षण बचाव दौरा सुरु आहे. त्या दौऱ्यानिमित्त बीड जिल्ह्यातील गेवराई मतदार संघात शनिवार (दि.२४) रोजी ओबीसी आरक्षण बचाव सभा आयोजित करण्यात आली होती. त्या सभेपूर्वी त्यांनी बीड शहरातील शासकीय विश्रामगृह येथे पत्रकार परिषद घेऊन माध्यमांशी संवाद साधला.यावेळी प्रा.लक्ष्मण हाके यांनी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्यावर सडकून टीका केली. हाके म्हणाले की,उपोषण सोडताना शासनाने आम्हाला दिलेली आश्वासने हवेत विरगळून गेली आहेत. एकतर आम्हाला तिकीट दिलं जात नाही, जर दिलंच तर टार्गेट करुन पाडलं जात.

ओबीसींबद्दल एवढा नरेटिव्ह का? त्यामुळे येत्या विधानसभा निवडणुकीत कळेल ओबीसींची काय ताकत आहे. समाजाने ठरविले आहे, आता फक्त आणि फक्त ओबीसी उमेदवाराच्या बाजूने मत असेल. त्यानंतर एससी,एसटीला असणार आहे.ज्यांनी आमचे आरक्षण धोक्यात आणले त्यांना त्यांची जागा दाखवून देण्याचे काम समाज नक्कीच करेल, यात शंका नाही.यावेळी पृथ्वीराज चव्हाण यांच्यावर टीका करत असतांना हाके म्हणाले की, आंतरवाली सराटीला भेट घेऊन येणाऱ्यांनी ओबीसी आरक्षणाबद्दल आपली भूमिका अजून का स्पष्ट केलेली नाही.

दरम्यान बीड जिल्ह्यातील सहाही मतदार संघात आपण उमेदवार उभा करणार आहोत. त्यासाठी पूर्णपणे ताकत पणाला लावणार आहोत.त्यासाठी आपली संपूर्ण राज्यात चाचणी सुरू आहे.त्यामुळेच येणारी विधानसभा निवडणूक आम्ही टार्गेट केली असल्याचे प्रा. लक्ष्मण हाके यांनी बोलून दाखवले.

## ॲड. अनिल सुतार यांचा साश्रुनयनांनी अंत्यविधी

रायमोह/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड न्यायालयातील प्रसिद्ध विधिज्ञ ड अनिल सुतार यांचे दिर्घ आजाराने निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर रायमोह येथे साश्रुनयनांनी अंत्यसंस्कार करण्यात आले.



रायमोह येथिल मुळ रहिवासी व बीड जिल्ह्यातील प्रसिद्ध विधिज्ञ ड अनिल सुतार हे कर्करोगाने एक वर्षापासून त्रस्त होते.त्यांच्यावर पुणे येथिल खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते.अनिल सुतार यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन वकिली व्यवसाय सुरू करुन आपल्या मधाळ वाणी व परोपकारी वृत्ती मुळे स्वहिम्मतीवर स्वतः चे अस्तित्व निर्माण केले होते.आपल्या कष्टावर त्यांनी आपल्या दोन्ही मुलांना वैद्यकीय शिक्षण दिले आहे .त्यांनी आपल्या नातेवाईकांना व मित्रपरिवाराला मदतीचा हात दिला आहे.उसतोडणी मजुर,अबाला पिडीता तसेच गोरगरिबांचे वकील म्हणुन ड अनिल सुतार यांची ओळख होती.त्यांचा मित्रपरिवार मोठा होता.कर्करोगाने त्रस्त असताना त्यांची प्राणज्योत मालवली.त्यांच्या पार्थिवावर साश्रुनयनांनी रायमोह येथे अंत्यविधी करण्यात आले.याप्रसंगी बीड जिल्ह्यातील सर्व वकिल संघाचे पदाधिकारी,सर्व पक्षीय पदाधिकारी, मान्यवर, व्यापारी, पत्रकार मित्रपरिवार आप्तेष्ट सगेसोयरे संततधार पावसातही बहुसंख्येने उपस्थित होते.त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा,एक विवाहीत मुलगी असा परिवार आहे.सुतार परिवाराच्या दुःखात दैनिक पुण्यभूमी परिवार सहभागी आहे. पान २ वर...



## पोलिसांची सकाळीच कारवाई; बुलेटमधून संध्याकाळी फटाके

### बोंबला: फटाका बुलेटवर कारवाई चालू ठेवण्याची मागणी

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरात रस्त्यावरून फट् फट् करत जाणाऱ्या बुलेट च्या फटाका आवाजाने सर्वसामान्य नागरिकांना त्रास होत होता. अशा आशयाच्या बातम्या वर्तमान पत्रात प्रसिद्ध होताच पोलीस प्रशासनाने तात्काळ कारवाई करुन २० दुचाकीवर कारवाई करुन बुलेटसह इतर दुचाकी पोलीस स्टेशन गेवराई येथे लावण्यात आल्या आहेत. मात्र फटाका आवाज करणाऱ्या बुलेटच्या सायलेन्सर कारवाई प्रकरणी पोलिसांनी आपली जबाबदारी झटकून ही कारवाई आरटीओ व वाहतूक शाखेची असल्याचे सांगितले.

शहरात अनेक दिवसापासुन शाळा व महाविद्यालयातील मुली व रस्त्यावर चालणारे महिला, पुरुष व वयोवृद्ध नागरिकांना बुलेट च्या फटाकेचा त्रास सहन करावा लागत होता. महिला व मुलींना पाहुन जाणिव पूर्वक त्रास देण्याच्या उद्देशाने बुलेटचे पान २ वर...

## संत भगवान बाबा यांना अभिवादन

### डॉ. योगेश क्षीरसागर : शोभा यात्रेस दिली भेट



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांनी शहरातील संत भगवान बाबांच्या चौकात प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

डॉ.योगेश क्षीरसागर यांनी राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या जयंतीनिमित्त उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी श्री.संतभगवान बाबा जयंती उत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष अविनाश सानप, अध्यक्ष अनिकेत सानप, माजी नगरसेवक ड.महेश गर्जे, डॉ.शिवाजी पान २ वर...

**पडघम** | **जिल्ह्यातुन १०० तर बीड विधानसभेतून ३५ जन इच्छुक**

# सब गोलमाल हैं,बीडचे नेते जरांगेंच्या भेटीला!



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांनी आता विधानसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय पक्का केलेला दिसत आहे. त्यांनी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवायला सुरुवात केली आहे. अनेकांनी भेटून त्यांच्याशी चर्चाही केली आहे. त्यात माजी आमदार, विद्यमान आमदार आणि इतर मातब्बर नेत्यांचा समावेश आहे. अनेक बड्या पक्षातील लोकही मनोज जरांगे पाटील यांच्याकडून लढण्यास तयार आहेत.त्यामध्ये उबाटा गटाचे गेवराई मतदार संघाचे माजी. आ.बदामराव पंडितही देखील मनोज जरांगेंची भेट घेवून आले आहेत. अशी माहिती विश्वसनिय सूत्राने दिली.

### कोणी उघड तर कोणी लपून छपून

बीड जिल्ह्यातील अनेक मातब्बर नेते, मनोज जरांगे पाटील यांची भेट घेवून आलेले आहेत. या सर्वांना आमदार व्हायचे आहे.त्यामुळे कोणी उघड तर कोणी लपून छपून गाठीभेटी घेवून येत आहे. त्यामध्ये गेवराई मतदार संघातील नेत्यांचा देखील समावेश आहे. म्हणून निवडणूक तोंडावर कोण कुठे जाईल याचा काही नेम नाही.

राज्यात विधानसभा निवडणुक वारे वेगाने वाहू लागले आहेत. त्याबाबत मनोज जरांगे यांच्याकडे आतापर्यंत ८०० इच्छुकांनी अर्ज दिले आहेत. या सर्वांना आमदार व्हायचं आहे. मनोज जरांगे पाटील यांनीच हा आकडा शनिवारी जाहीर केला आहे. या आकड्यावरून मनोज जरांगे यांची लोकप्रियता किती आहे हे दिसून येत आहे.मनोज जरांगे यांनी मीडियाशी संवाद साधताना ही माहिती दिली. आमच्याकडे इच्छुकांचा मोठा डेटा आहे. सुमारे ७०० ते ८०० जणांनी अर्ज केले आहेत. या सर्व अर्जांची छाननी होईल. तज्ज्ञांची समिती हे काम करेल. पश्चिम महाराष्ट्रातून सर्वाधिक अर्ज आले आहेत. तर मराठवाडा, विदर्भातूनही चांगला प्रतिसाद मिळाला आहे. पण कोकण आणि मुंबई विभागातून कमी अर्ज आले आहेत. अर्ज येतच आहेत. त्यामुळे इच्छुकांचे अर्ज स्वीकारण्याची तारीख वाढवायची की नाही हे ठरवायचे आहे, असं मनोज जरांगे पाटील यांनी सांगितलं आहे.

## राज्यातील गृह खाते सध्या निद्रावस्थेत

### संदीप क्षीरसागरः तहसीलदारांना राष्ट्रवादीचे निवेदन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बदलापूर येथे घडलेल्या घटनेच्या निषेधार्थ बीड जिल्हाधिकारी कार्यालय समोर महाविकास आघाडी व मित्र पक्षांच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी राज्यातील गृह खाते सध्या निद्रावस्थेत असून, गृह खात्याने फोडाफोडीचे राजकारण करण्याऐवजी कायद्याचे राज्य निर्माण करण्यासाठी काम करावे असे मत आ. संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केले.



बदलापूर येथे दोन चिमुकल्या शाळकरी मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. यासोबतच राज्यातील विविध ठिकाणी महिलांवर व मुलींवर अत्याचार होत असल्याचे दररोज समजत आहे. यावरून राज्यातील सरकारचे गृह खाते सध्या कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्याऐवजी फोडाफोडीचे राजकारण करण्यातच व्यस्त आहे. राज्यातील जनसामान्यांच्या सुरक्षा प्रश्न उपस्थित झाला की गृह खाते निद्रावस्थेत जाते. फोडाफोडीचे राजकारण करण्यापेक्षा गृह खात्याने आणि सरकारने कायद्याचे राज्य निर्माण करण्यासाठी काम करायला हवे असे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष आ. संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केले. दरम्यान आजच्या दिवशी बदलापूर घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडी कडून बंद पुकारण्यात आला होता परंतु व न्यायालयाच्या सूचनेनंतर बंद मागे घेऊन राज्यातील पान २ वर...

# नभाच्या पल्याडचे


उत्सवांचे पडघम वाजू लागले असतानाच्या काळात आणखी एक दिवस मिरवणुका, फटाके अशा कोणत्याही गाजावाजाविना उत्साहाने साजरा करण्याची संधी चालून आली. २३ ऑगस्ट. गेल्या वर्षीचा हाच तो दिवस ज्या दिवशी चंद्राला स्पर्श करणारा भारत हा जगातील चौथा देश ठरला. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर जाणारा तर पहिलाच. विक्रम लँडर चंद्राच्या त्या खडबडीत पृष्ठभागावर अलगद उतरले आणि भारतीय अवकाश संशोधन संस्थेतील शास्त्रज्ञांसह ते दृश्य विविध प्रकारच्या पडद्यांवर 'याचि देही याचि डोळा' पाहणाऱ्या कोट्यवधी भारतीयांनी एकच जल्लोष केला. जगानेही टाळ्या वाजवल्या. कारण, अमेरिका, रशिया आणि चीननंतर असा पराक्रम करणाऱ्या भारताने घेतलेली ही अवकाश झेप अनेकार्थांनी आपली 'ताकद' दाखवून देणारी होती. याला प्रतीकात्मकतेपलीकडेही अनेक आयाम होते. तेव्हा हा राष्ट्रीय अंतराळ दिन म्हणून घोषित करणे ठीकच. पण चंद्रावर 'विक्रम'चे उतरणे हा जसा अखेरचा टप्पा नव्हे, तसा तो पहिलाही नव्हे, कारण भारताच्या राष्ट्रीय अंतराळ दिवसाला अनेक वर्षांचे सुकृत आहे, हेही ध्यानात असू द्यावे.

भारताचा अवकाश संशोधनाचा प्रवास स्वातंत्र्यानंतर जवळपास दीड दशकात सुरू झाला. डॉ. विक्रम साराभाई यांच्या द्रष्ट्या नेतृत्वाखाली अवकाश संशोधनासाठी राष्ट्रीय समिती नेमली गेली. तीच पुढे विकसित होत १९६९ मध्ये भारतीय अवकाश संशोधन संस्था अर्थात इस्राोची स्थापना झाली. भारतीय राष्ट्रीय उपग्रह कार्यक्रमाने अवकाश संशोधनाच्या उपयोजनांची मुहूर्तमेढ रोवली. दूरसंचार, दूरचित्रवाणी प्रक्षेपण, हवामान अंदाज, शिक्षण अशा विविध क्षेत्रांसाठी हे गरजेचे होते. यामध्ये केंद्रस्थानी होता तो संशोधनासाठी देशी तंत्रज्ञान विकसित करण्याचा मुद्दा. सुदूर संवेदन, उपग्रह यानांची संरचना अशा काही कळीच्या गोष्टींवर त्यासाठी काम करणे आवश्यक होते. 'इस्राो'च्या स्थापनेआधी थुंबा गावात उभारण्यात आलेले यान प्रक्षेपण स्थानक हा पहिला महत्त्वाचा टप्पा होता. भारताचा अवकाश कार्यक्रम आत्मनिर्भर आणि विकासात मोठे योगदान देणारा असावा, असे विक्रम साराभाईंचे ध्येय होते. 'इस्राो'ने १९७५ मध्ये सोडलेला पहिला उपग्रह आर्यभट्ट ही त्या दिशेने घेतलेली झेप होती. भास्कर, रोहिणी उपग्रह मालिका आणि नंतर इन्सॅट मालिका हे भारतीय अवकाश कार्यक्रमातील नि:संशय मैलाचे दगड. हा सारा प्रवास ऐंशीच्या दशकापर्यंतचा.

नव्वदच्या दशकात ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपक वाहन अर्थात पीएसएलव्हीचे 'उड्डाण' हे 'इस्राो'चे ध्रुवीय कक्षांमध्ये उपग्रह सोडण्यासाठीचे जणू कार्ययंत्र झाले. पृथ्वीवरील निरीक्षणांपासून सुदूर संवेदनासाठीचे उपग्रह अवकाशात सोडण्यापर्यंतच्या प्रवासात पीएसएलव्हीनेच एक प्रकारे सारथ्य केले. चंद्रयान आणि मंगलयानाची उड्डाणेही पीएसएलव्हीच्याच सारथ्यात झाली. भूसंकालिक उपग्रह प्रक्षेपक वाहन अर्थात जीएसएलव्हीने भूस्थिर कक्षेत उपकरणे सोडण्याची सिद्धता प्राप्त करून आपल्या क्षमता आणखी रुंदावल्या. या प्रवासाची उजळणी एवढ्यासाठी, की अवकाश संशोधनातील कामगिरीचे मूल्यमापन करताना त्यातील पूर्वसूरींचे योगदान विसरले जाऊ नये. अवकाश संशोधनाचे आणि विस्ताराचे सगळे कार्यक्रम राबविताना त्यासाठीची राजकीय इच्छाशक्तीही महत्त्वाचीच. स्वातंत्र्यानंतर भाकरीचा चंद्र शोधण्याची भ्रांत पडलेल्या देशवासीयांना प्राधान्यक्रमांच्या यादीत अवकाशात उपग्रह सोडण्याचा समावेश करणे वेडगळपणाचे वाटलेच असणार. पण, त्याचा उपयोग त्यांचे आयुष्य आणखी सुकर करण्यासाठी होणार आहे, याची जाणीव या लोकशाही देशात रुजविणे खचितच गरजेचे होते. ते काम पं. जवाहरलाल नेहरू यांच्यासारख्या विज्ञानवादी नेतृत्वाने केले, हे अंतराळ दिनी आठवणेही गरजेचे. कवितेत विरघळलेला चंद्र प्रत्यक्षात तितका मृदू आहे का, हे आज त्याशिवाय आकळले नसते.

येत्या काळात गगनयान प्रकल्पाच्या माध्यमातून भारत अवकाशात मनुष्य पाठवेल. नासाबरोबरच्या 'निसार' प्रकल्पाद्वारे पृथ्वीचा अभ्यास करायचा आहे, तर आणखी एका दशकानंतर अवकाशात स्वत:चे अवकाश स्थानक स्थापण्याचेही भारताने ठरविले आहे. या संशोधनासाठीचे मनुष्यबळ तसेच देशी तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी विद्यार्थ्यांना अवकाश संशोधन क्षेत्राकडे आकर्षित करावे लागेल. राष्ट्रीय अवकाश दिनाने ते साध्य करणे अपेक्षित आहे. मूलभूत संशोधनापेक्षा नोकरी बरी, अशी मानसिकता असलेल्या आपल्या देशात वेगवेगळे दिन साजरे करणे बहुतेकांना आवडते. पण त्यात त्या दिनाचा हेतूच मरून जातो. ही हेतुहत्या करण्यात आपल्याच संस्था पुढे असतात, हे दुर्दैव. अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषदेने – म्हणजे 'एआयसीटीई'ने सप्टेंबर २०२३ च्या पहिल्या आठवड्यात 'चंद्रयान महोत्सव' साजरा करण्यासाठी देशातील २०० तंत्रशिक्षण संस्थांची निवड केली. पण या महोत्सवात पोस्टर स्पर्धा, विज्ञान कथाकथन, नृत्यस्पर्धा यांचाच भरणा होता. हे असले महोत्सव साजरे करण्यापेक्षा 'एआयसीटीई'ने या २०० संस्थांच्या क्षमतांची तपासणी करून जर पुढल्या काळात त्या वाढवण्याचा प्रयत्न केला असता, तरी खूप झाले असते. या २०० संस्थांमध्ये तमिळनाडूतील सेलमचे 'सोना तंत्रशिक्षण महाविद्यालय'देखील होते. 'चंद्रयान– ३'ला पुढल्या झेपेआधी पृथ्वीच्या कक्षेत ठेवण्यासाठी उपयुक्त असलेले काही भाग सेलमच्या या महाविद्यालयात तयार झाले होते. आजघडीला दिल्लीच्या किरोडीमल महाविद्यालयात सध्या मंगळाच्या पृष्ठभागावरील वाहन घडवण्याची तयारी सुरू आहे. आपले विद्यार्थी आळशी नाहीत. पण त्यांनी कोणत्या दिशेने काम करावे, हे सांगण्याची मात्र गरज आहे. 'चंद्रयान–३'च्या प्रक्षेपणावेळी सर्व आयआयटी व अन्य तंत्रशिक्षण संस्थांतील विद्यार्थ्यांना एकत्र जमवून चित्रवाणीवरील थेट प्रसारण दाखवण्याचा आदेश 'वरून' निघाला होता. वास्तविक असल्या आदेशांची गरज नाही. त्याऐवजी अध्यापकांनी अधिक नेमकी माहिती देणे, अधिक प्रश्न विचारण्यास विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे हे अपेक्षित आहे. भारतीय ज्ञानपरंपरा मोठी आहेच, पण विक्रम साराभाई ते एपीजे अब्दुल कलाम यांच्या ज्ञानलालसेचा वारसा जागता ठेवण्याची गरज अधिक आहे.

# धाडसी लेखक!



प्रल्हाद केशव अत्रे ऊर्फ आचार्य अत्रे या नावाभोवती केवळ एक गुण नाही तर अष्टपैलू व्यक्तिमत्व कसं असतं हे पाहायचं असेल तर प्रल्हाद केशव अत्रे यांच्याकडे पाहता येईल.प्रल्हाद केशव अत्रे केवळ लेखक म्हणून किंवा कवी , संपादक इथपर्यंत अनेकांना ठाऊक मात्र,मराठीतील नावाजलेले लेखक, कवी, नाटककार, संपादक, चित्रपट निर्माते, शिक्षणतज्ज्ञ, राजकारणी व वक्ते होते. ते महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी उभ्या राहिलेल्या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील प्रमुख नेते होते. प्रल्हाद केशव अत्रे यापेक्षा केशवकुमार या टोपण नावाने त्यांची महाराष्ट्रभर किंबहुना देशभर ओळख.१३ ऑगस्ट १८९८ रोजी महाराष्ट्रात जन्म झालेल्या केशव कुमारांचा यावर्षी शतकोत्तर जयंती रौप्य महोत्सव या निमित्ताने केलेला लेखक प्रपंच. मराठी साहित्याच्या अनेक प्रकारात यात कथा, कादंबरी, नाटक, कविता, चरित्र लेखन,वृत्तपत्र आदी क्षेत्रामध्ये केशवकुमारांच मोठं योगदान . त्यांची डॉ. लागू, झेंडूची फुले, कऱ्हेचे पाणी (आत्मचरित्र) पुस्तके प्रसिद्ध आहेत.आचार्य अत्र्यांनी मराठी भाषेत विपुल लेखन केले असून त्यांची अनेक पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत.संपादक म्हणून त्यांनी महापुरुषांच्या विचारांची पेरणी केली.२१ जानेवारी १९४० ला अत्रे यांनी नवयुग हे वृत्तपत्र सुरू केले.इ.स. १९२३ साली अत्र्यांनी 'अध्यापन' मासिक सुरू केले. इ.स. १९२६ मध्ये 'रत्नाकर' व इ.स. १९२९ साली 'मनोरमा', आणि पुढे इ.स. १९३५ साली 'नवे अध्यापन' व इ.स. १९३९ साली 'इलाखा शिक्षक' ही मासिके काढली. जानेवारी १९, इ.स. १९४० साली त्यांनी नवयुग साप्ताहिक सुरू केले. जुलै ८, इ.स. १९६२ पर्यंत ते चालू होते. जून २, इ.स. १९४७ रोजी अत्र्यांनी जयहिंद हे सांजदैनिक सुरू केले; परंतु ते वर्षभरच चालले. नोव्हेंबर १५, इ.स. १९५६ रोजी त्यांनी मराठा हे दैनिक सुरू केले. ते त्यांच्या हयातीनंतरही काही काळ प्रकाशित होत होते. २१ जानेवारी १९४०ला अत्रे यांनी नवयुग हे वृत्तपत्र सुरू केले. त्यावेळी अत्रे काँग्रेसमध्ये होते. त्यामुळे काँग्रेसची विचारसरणी या वृत्तपत्रातून स्वातंत्र्य मिळेपर्यंत मांडली जात होती.

अष्टपैलू व्यक्तिमत्त्व केशव कुमार जेव्हा भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर मराठी पत्रकार व लेखक यांच्या वतीने आदरांजली अर्पण करताना भाषणात म्हणाले भारतातील एका महान विभूतीला मी आदरांजली अर्पण करण्यास उभा आहे. या महान नेत्याच्या मृत्यूने मृत्यूला मृत्यूचीच कीव वाटू लागली आहे. मरणानेच आज आपले हसू करून घेतले आहे. मृत्यूला काय दुसरी माणसे दिसली नाहीत? मग त्याने इतिहास निर्माण करणाऱ्या इतिहासाच्या या पर्वावरच का झडप घातली?महापुरुषांचे जीवन पाहू नये असे म्हणतात. पण त्यांचे मरण आपण पाहत आहोत. भारतात असा युगपुरुष शतकाशतकांत तरी होणार नाही. झंझावाताला मागे सारणारा, महासागराच्या लाटांसारखा त्यांचा अवखळ स्वभाव होता. असा शूरवीर, बहाद्दर पुरुष आज मृत्यूच्या चिरनिद्रेच्या मांडीवर कायमचा विसावा घेत आहे. त्यांचे वर्णन करण्यास शब्द नाहीत. अशी एकही गोष्ट नाही की, त्याविरुद्ध 'बाबां'नी बंड पुकारले नाही. अन्याय जुलूम ,जबरदस्ती, विषमता जेथे दिसली तेथे त्या



पदमाकर उखळीकर,
मो.९९७५१८८९१२

वीराने आपली गदा उगारली . महात्मा गांधीना वाचविण्यासाठी आपल्या लाखो अस्पृश्य बांधवांचे कायमचे नुकसान करूनही, त्यांनी पुणे करारावर सही केली. ते कच्चा गुरुचे चेले नव्हते . बुद्ध, कबीर, फुले हे त्यांचे गुरू होते. अस्पृश्यता जाळा असे म्हणणारा हा पुरुष स्वतंत्र भारताच्या घटनेचा शिल्पकार बनला. त्यांना आम्ही छळले, सरकारने छळले. अशा परिस्थितीत मी हिंदू म्हणून जन्मलो तरी मरतांना हिंदू म्हणून मरणार नाही. हे त्यांनी खरे करून दाखविले. कारण आपल्याला ठाऊकच आहे की बाबासाहेबांनी बौद्ध धम्म स्वीकारला होता. शोक करणे त्यांना आवडणार नाही. आज त्यांचा प्राण त्यांच्या कुडीतून बाहेर पडून सात कोटींच्या शरीरात शिरला आहे. त्यांचे चारित्र्य, निर्भयपणा व दुसरे गुण अंगी बाणवून आपण त्यांचे कार्य पूर्ण केले पाहिजे. हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. लेखक आचार्य अत्रे यांनी वाहिलेली श्रद्धांजली डॉ. बाबासाहेब आंबेडकर आज आपल्यात असल्याची जाणीव आणि शतकानुशतके असा महापुरुष पुन्हा होणे अशक्य हे तितकेच खरे! दै. मराठा वृत्तपत्रांच्या ७ डिसेंबर १९५६ च्या अंकामध्ये आचार्य अत्रे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर लेख लिहिला आणि त्यात हिंदूंनी किती छळले याची या लेखात प्रचिती येते. पाच हजार वर्षे हिंदू समाजाने अस्पृश्यांचा छळ केला त्या समाजाला आंबेडकर हे बिनतोड, बंडखोर उत्तर होते.असे परखडपणे ते म्हणतात.हे म्हणजे अत्रेंच धाडस.आजकाल लेखकांचा धाडसीपणा त्यांच्या लेखनात कुठेच दिसत नाही किंवा क्वचितच वाचायला मिळतो. कारण, कोणत्या समाजाच्या कधी भावना दुखावल्या जातील सांगता येत नाही. त्यामुळे त्या समाजाचा रोष लेखक घ्यायला तयार नाहीत किंबहुना राजकीय वलयापुढे ते कुठेतरी वाकलेले आहेत.असे दिसते. असो, अत्रेंसारख्या परखड,विद्वान लेखकांना सलामच केला पाहिजे. अशा धाडसी अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा

शतकोत्तर जयंती रौप्य महोत्सवानिमित्त विनम्र अभिवादन!

# खजाना बावडी संरक्षित करा

## मागणी : स. संचालकांना शिष्टमंडळ भेटले



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

अहमदनगरच्या निजामशाहीच्या कालखंडात इ.स. १५७२ मध्ये बलगुजार भागातील हजारो एकर शेतीला पाणीपुरवठा करून त्या भागातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी सलाबतखान या बीडच्या सरदाराने बांधलेली खजाना विहीर ऐतिहासिक दृष्ट्या विलक्षण महत्त्वाची असून महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्व विभागाने या जलस्मारकाला संरक्षित करून बीडचा दैदीप्यमान इतिहास संवर्धित करावा या आशयाची मागणी करणारे बीड जिल्हा इतिहास परिषदेच्या शिष्टमंडळाने डॉ. सतीश साळुंके यांच्या नेतृत्वाखाली मराठवाडा विभागाच्या पुरातत्व खात्याच्या सहाय्यक संचालिका जया वाहने यांना संभाजीनगर कार्यालयात भेट देऊन निवेदन दिले.यावेळी जिल्हा इतिहास परिषदेचे मंगेश रोटे, दीपक सरवदे व पुरातत्त्वविद अण्णासाहेब गडदे यांच्यासह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनात खजाना बावडीचे महत्त्व व वैशिष्ट्य नमूद करून करण्यात आले. सहाय्यक संचालिका जया वाहने यांनी तातडीने खजाना बावडीचे शासकीय स्तरावर सर्वेक्षण करून मागणीचा सकारात्मक विचार केला जाईल व खजाना बावडीचे संरक्षित स्मारकाच्या यादीत समावेश करण्यासाठी शासकीय प्रक्रिया सुरू केली जाईल असे आश्वासन दिले. बीड जिल्ह्यातील प्राचीन स्थळे बीड जिल्ह्याचा सांस्कृतिक व ऐतिहासिक वैभवशाली इतिहास असून तो जपण्यासाठी जन आंदोलन उभा करण्याचा निर्धार परिषदेचे अध्यक्ष डॉ. सतीश साळुंके यांनी व्यक्त केला.

# पान एक वरून

### पोलिसांची सकाळीच कारवाई

फटाके फोडणारे रोड रोमीयोंवर पोलीस प्रशासनाने २४ ऑगस्ट रोजी शेकडो वाहनांवर पो.नि. बांगर यांनी कारवाई करुन वाहने ठाण्यात जमा केली आहेत . परंतु बुलेटचे फटाके फोड्डन उद्रेक करणारे कारवाई होत असल्याचे पाहुन फरार झाले. शहरात नागरिकांना त्रास देणारे बुलेटचे फटाके बंद होत नाही तोपर्यंत पोलिसांनी ही कारवाई सुरु ठेवावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.रोडरोमियोंना शहरात फिरणाऱ्या बुलेटच्या सायलेन्सरमधून फटाक्यांचा आवाज काढून मजा येत असेल. परंतु या फटाक्याच्या आवाजामुळे अनेक जणांना त्रास होत आहे. शहरात अनेक दिवसापासुन महिला – मुली दिसल्या की बुलेटच्या सायलेन्सरमधून फटाके फोडायचे असेही बहाद्दर गेवराईमध्ये दिसुन येत होते. गेवराई पोलीसांनी क्शन घेत शनिवारी कारवाई केली व सायलन्सर बदलेले बुलेट, विनानंबरचे दोन चाकी मोटर सायकल जप्त करुन गेवराई पोलीस स्टेशन येथ लावण्यात आल्या आहेत. ही कारवाई पो . नि . बांगर, सहा.पो.नि.संतोष जंजाळ आदींनी केली आहे.

### संत भगवान बाबा यांना

तिडके, समर्थ तांदळे, मोहन आघाव, विशाल तांदळे, ड.राहुल आघाव, संग्राम बांगर, संतोष बडे, निखिल खेडकर यांच्यासह जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.शिरूर का.तालुक्यातील रायमोहा येथे राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या जयंतीनिमित्त सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या शोभायात्रेस भेट देवून डॉ. योगेश क्षीरसागर यांनी बाबांच्या प्रतिमेचे पूजन केले. यावेळी रायमोहाचे सरपंच जालिंदर सानप, येवलवाडीचे सरपंच प्रदीप सानप, हाटकरवाडीचे सरपंच चिंतामणी नागरगोजे, सांगळवाडीचे सरपंच बाळकृष्ण ढाकणे, माजी सरपंच आदिनाथ सानप, उपसरपंच अतुल सानप, दिलीप जायभाये, अवी मिसाळ यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राज्यातील गृह खाते

सर्व भागांमध्ये महाविकास आघाडीच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात आले याच पार्श्वभूमीवर बीडमध्ये जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयासमोर महाविकास आघाडीतील घटक पक्ष व इंडिया आघाडीतील मित्रपक्ष यांच्यावतीने निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी बदलापूर घटनेत अत्याचारी असलेल्या नराधमास फाशीची शिक्षा द्या अशी मागणी आंदोलकांनी केली. याप्रसंगी माजी आ.सय्यद सलीम, माजी आ.उषाताई दराडे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, परमेश्वर सातपुते, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचज्येष्ठ नेते कॉ.नामदेव चव्हाण यांच्यासह महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे सर्व पदाधिकारी तसेच इंडिया इंडिया आघाडीतील मित्र पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व सामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पान सहा वरून

### कृर्षी महोत्सव नव्हता

आहेत,मागील अतिवृष्टीचे अनुदान अनेकांना मिळाले नाही,मागील वर्षाच्या पिक विम्याची बोळवन २५ % केली, उर्वरित ७५ टक्के आज ही विमा मिळाला नाही. हे सगळे प्रश्न शेतकऱ्यांशी भेडसावत असताना हा कृषी महोत्सवाच्या माध्यमातून लाखो रुपयेची उधळपट्टी करून काय साध्य होईल. या कृषी महोत्सावर झालेल्या एक एक रुपया खर्चाचा जावाब या कृषी विभागाला आम्ही विचारणार आहोत.येवला आवाज द्व्य कार्यक्रमासाठी व्यर्थ खर्च करणे म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळल्यासारखे आहे. असा आरोप शेकापचे राज्य चिटणीस मंडळ सदस्य भाई मोहन गुंड यांनी प्रसिद्धी पत्रकात केला आहे.

### सोयगाव तहसीलवर

कॉ.प्रा.राम बाहेती, भाकप सिल्लोड तालुका सचिव कॉ. सय्यद अनिस, लाल बावटा शेतमजूर युनियनचे सिल्लोड तालुका अध्यक्ष पुंजाराम कांबळे, असलम मिर्झा,सोयगाव तालुका अध्यक्ष प्रताप चव्हाण, त्रिंबक शेजुळ, अरुण राठोड , शेख रिजवान अबूजर बागवान, शेख अजीम, पांडुरंग गायकवाड , इस्माईल शहा ,संतनाम चव्हाण ,सुभाष राठोड,दिलीप चव्हाण,सुभाष माळी,यांनी याचे नेतृत्व केले.तहसील कार्यालयात मोर्चाचे विसर्जन झाले यावेळी कॉ. सय्यद अनिस, पुंजाराम कांबळे त्र्यंबक शेजवळ संतनाम चव्हाण ,राम बाहेती आदींची मनोगत झाली.कष्टकऱ्यांना व गायरान धारकांना भूमिहीनांना न्याय न मिळाल्यास सोयगाव ते छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत पाई संघर्ष दिंडी काढण्याचा यावेळी निर्णय घेण्यात आला सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात किंवा ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात ही दिंडी निघणार आहे असा इशारा यावेळी कॉ.राम बाहेती व सय्यद अनिस यांनी दिला. बदलापूर तसेच पुणे आणि इतर ठिकाणी झालेल्या घटनेचा यावेळी लाल बावटा शेतमजूर युनियन व कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला

### मानवतावादी कवी संमेलनाचे

, धिमान पंडित कांबळे (उस्मानाबाद), धिमान व्ही. एस. गायकवाड (उस्मानाबाद) धिमान प्रा.डॉ. शिवप्रसाद घोडके (लासूर स्टेशन, ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर), धिमती सत्यशोधिका आम्रपाली पारवे (मुंबई) इत्यादी सहभागी होणार आहेत. तरी साहित्यिक व साहित्य रसिक बंधु भगिनींना विनंती करण्यात येते की, या मानवतावादी कवि संमेलनामध्ये उपस्थित रहावे. असे निवेदन धिमान. चंद्रप्रकाशजी शिंदे (अध्यक्ष म.पसृ.सा.प महा.) धिमान प्रा. शंकरराव चव्हाण (उपाध्यक्ष म.प्र.सृ.सा.प. महा.) धिमान मधुकर पवळे (सचिव म.प्र.सृ.सा.प महा.) सुरज साठे, धिमान प्रा. भारती फुलेकर, धिमान डॉ. जयश्री शिदे, धिमान डॉ. सुनिल गायकवाड, प्रा. डॉ. बाबासाहेव जावळे, धिमान सुभाष गवळी, इत्यादी राज्य सदस्य म.प्र.सृ.सा.प महा. यांनी केलेले आहे.

### पैठण तालुक्यात जोरदार

फुटल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठे नुकसान झाले असून सुदैवाने यात कुठलीही जीवित हानी झालेली नाही महसूल विभागाचे मंडळ अधिकारी शुभांगी शिंदे, तलाठी तोरमकर, सरपंच विक्रम जायभाये, महंमद भाई यांनी नुकसानीचा पंचनामा करण्याची मोहीम हाती घेतली आहे.दरम्यान शुक्रवारी रोजी तालुक्यात झालेल्या पावसाची नोंद शनिवारी रोजी तहसील कार्यालयात करण्यात आल्यानुसार पैठण ५२, पिंपळवाडी पिं ४२, बिडकीन ४६, ढोरकिन ६४,बालानगर ३७,नांदर ४०,आडुळ ८८, पाचोड ८०, लोहगाव ७६, विहामांडवा ४४ मी.मी पाऊस पडला पडला असून आज पर्यंत ४५४७ मी.मी झाल्यामुळे मागील वर्षाच्या नाथसागर धरणातील पाण्याच्या टक्केवारी वाढली असून शनिवारी रोजी दुपारी या नाथसागर धरणात २९ हजार ३९९ क्युसेक पाण्याची आवक सुरू असून सध्या धरणाची पाण्याची टक्केवारी ३७.४२ आहे.

### ...अन्यथा ऑफलाईन तक्रारी

सदरील प चालू करून शेतकऱ्यांना ऑनलाइन तक्रारी दाखल करण्यासाठी पर्याय खुला करावा किंवा सरोवर डाऊन असल्याकारणाने जर शेतकऱ्याला ऑनलाइन तक्रार दाखल करता आली नाही तर त्यांच्यासाठी ऑफलाइन तक्रारी घेण्याची प्रक्रिया सुरू करावी अन्यथा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने शेतकऱ्यांच्या नुकसानीस कृषी विभागासह विमा कंपनीला जबाबदार धरून कृषी कार्यालयासह विमा कंपनीच्या कार्यालयांना ताळे ठोकण्याचा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे नेते, शेतकरी कामगार पक्षाच्या मध्यवर्ती समितीचे सदस्य भाई नारायण गोले पाटील यांनी नित्रुड महसूल मंडळातील अतिवृष्टी झालेल्या गावांच्या भेटी घेऊन शेतकऱ्यांशी संवाद साधताना शिंदेवाडी येथे दिला, तसेच शेतकऱ्याच्या विविध मागण्यासाठी होऊ घातलेल्या ३० ऑगस्ट रोजी च्या पात्रुड येथील रास्ता रोको आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले त्यावेळी त्यांच्या समवेत प्रा. बालासाहेब येवले, नितीन येवले, फजलुभाई यांच्यासह शिंदेवाडी येथील शेकडो शेतकरी बांधव उपस्थित होते.

### नराधमांना बंदुकीने गोळ्या

मारणाऱ्या, नराधमांची संख्या भारतात , राज्यात वाढत जात आहे त्यामुळे भारतातील, राज्यातील महीला,मुली , असुरक्षितन रहाता सुरक्षित असाव्यात म्हणून व होणाऱ्या अत्याचाराला नियंत्रण ठेवण्यासाठी असा प्रकार केल्यास नराधमाला बंदुकीच्या गोळ्या घालून जागीच मारण्यात यावे अशी विनंती केंद्र व राज्य शासनाला निवेदनाद्वारे विनंती करतो त्यामुळे भारतात , महाराष्ट्रराज्यात असे अनुचित प्रकार घडणार नाही व अशा प्रकारे होणारे अत्याचार थांबवण्यासाठी केंद्र व राज्य शासनाला निवेदनाद्वारे विनंती करतो की बदलापुर, कोलकत्ता, येथील घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने यापुढे अत्याचार करणाऱ्या नराधमांना जागीच बंदुकीच्या गोळ्या घालून ठार करण्यात यावे असे आदेश केंद्र व राज्य शासनाने पोलिस प्रशासनाला देण्यात यावे अशी विनंती निवेदनाद्वारे शासनाला रोहन गलांडे पाटील यांनी केली आहे.

### महामार्गावरचा पर्यायी

पांगरी जवळील वाण नदीवर असलेला मुख्य पूल काढून टाकण्यात आला असुन या ठिकाणी नवीन पूल निर्माण करण्याचे काम सुरू आहे. या पुलाचे काम पूर्ण झाले नसल्याने या ठिकाणी माती व मुरुमाचा भराव टाकून नदीपात्रातच एक पर्यायी पूल तयार करून मार्ग तयार करण्यात आला होता. वाण नदीवर नागापूर येथे वाण धरण आहे. हे धरण १००% भरल्याने पाऊस झाल्यानंतर संपूर्ण पाणी हे नदीपात्रात येत आहे. काल (शुक्रवारी) मध्यरात्रीनंतर परळी तालुक्यात मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे वाण नदीला मोठ्या प्रमाणावर पाणी आले आहे. या पाण्याने पांगरी जवळील हा पर्यायी पूल वाहून गेला आहे. दुसरा पर्यायी मार्ग नसल्याने परळी ते बीड हा रस्ता आता बंद झाला आहे.

### बीडची गावे अंबाजोगाईकडे

सा. वा. विभाग अंबाजोगाई येथे हस्तांतरित करण्यात आले असल्याचे आदेश दि. १८ आगस्ट रोजी दिले आहे. या प्रकरणी बीड तालुक्यातील ग्रामस्थांनी संताप व्यक्त करत आंदोलनाचा इशारा दिला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग सुरू झाल्यापासून बीड तालुक्यातील गावे बीड विभागात असल्याने त्यांना सोयीचे होते परंतु राजकीय हेतूने प्रेरित होऊन आ. नमिता मुंदडा व मुंदडा कुटुंबीयांकडून केवळ त्रास देण्याच्या उद्देशाने बीड तालुक्यातील २० ते २५ कि. मी बीडच्या जवळ असलेल्या गावांना ८० कि.मी लांब असलेल्या अंबाजोगाई सा.वा विभागाकडे हस्तांतरित करुन संबंधित अधिकाऱ्यांना दबावाखाली घेऊन आपल्या मर्जीतील लोकांची कामे करायची व इतरांना त्रास देण्याच्या हेतूने हा सर्व खटाटोप यांनी केला असून हा डाव यशस्वी होणार नाही असा इशारा बीड तालुक्यातील गावांच्या वतीने देण्यात आला आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई-मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# सततच्या बत्तीगुलमुळे नागरिक त्रस्त

**संतप्त** विजेचा प्रश्न सोडवण्याची मागणी

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरात थोडासा जरी पाऊस पडला की विजपुरवठा खंडित केला जातो. गुरुवारी रात्री पाऊस सुरु होताच वीज गुल झाली काही भागात रात्रभर वीज गायब होती. महावितरणकडून नेहमीच काम करण्यासाठी दिवसदिवस लाईट बंद ठेवून नेमकं काय काम केलं असा संतप्त सवाल महावितरण च्या भोंगळ कारभाराला वैतागलेले नागरिक विचारत आहे..

सोयगाव शहरातील विजपुरवठा गेल्या काही महिन्यापासून सुरळीत होत नाही. कधी रोहित्र जळतात, कधी केबल खराब होतात तर कधी फ्यूज उडणे डियू पडणे या कारणामुळे लाईट जाते.प्रत्येक भागात ह्या समस्या आहेत. तसेच सोयगाव च्या ३३ के व्ही उपकेंद्रात बिघाड होतो. त्यामुळे अनेकदा तासंतास वीज पुरवठा खंडीत होतो. बऱ्याच वेळा मेंटेन्स साठी दिवस दिवस वीज पुरवठा बंद ठेऊन काम केले जाते. तेव्हा आता लाईट जाणार नाही वीज पुरवठा सुरळीत होईल असे वाटते परंतु वारंवार जाणाऱ्या लाईट ची समस्या कायम आहे. सध्या तर पाऊसाच्या हलक्या सरी सुरु होताच वीज पुरवठा खंडीत होत आहे. त्यामुळे नागरिकांना खूप त्रास होत आहे. गुरुवारी रात्री पाऊस सुरु होताच लाईट गेली काही भागात रात्री तीन वाजेपर्यंत विजपुरवठा खंडित होता तर गलवाडा फिडर वर रात्रभर लाईट नव्हती त्यामुळे अर्ध शहर रात्रभर अंधारात राहिलं.



### उकाडा अन् मच्छर

सोयगाव परिसरात सध्या प्रचंड गरमी आणि उकाड्यामुळे नागरिक हैराण आहे त्यात वीज पुरवठा खंडीत झाल्यावर पंखे बंद होतात त्यामुळे प्रचंड गरमी सहन करावी लागते सोबत डास मच्छर झोपू देत नाही.

### ...तर समस्या कुठे मांडाव्यात

महावितरण चे कर्मचारी रात्री नागरिकांचे फोन उचलत नाही त्यामुळे अनेकवेळा युवक स्वतः रोहित्रावर जाऊन बिघाड दुरुस्त करतात महावितरण चे सोयगाव येथील वीज पुरवठ्याकडे पूर्ण दुर्लक्ष होत आहे. शहरातील या वीज समस्याकडे महावितरण च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष देऊन प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढावा अशी मागणी होत आहे.


# मांडवेवाडीच्या तरुणाचा अपघातात जागीच मृत्यू

डोंगरकिन्ही/पुण्यभूमी प्रतिनिधी

डोंगरकिन्ही जवळील खडकडोह येथिल झालेल्या भिषण अपघातात मांडवेवाडी येथिल तरुणाचा मृत्यू झाला असुन डोंगरकिन्ही परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मांडवेवाडी येथिल शेतकरी शेतीतील काही वस्तु आणण्यासाठी डोंगरकिन्ही कडुन पाटोदा येथे जात होते त्याच वेळेस पाटोदा कडुन एक टिपर भरधाव वेगाने डोंगरकिन्ही कडे येत होते.या भरधाव टिपरने मोटार सायकलला जोराची धडक दिल्याने तात्याराम बाजीराव मांडवे ४५ या तरुणाचा जागीच मृत्यू झाला.अपघात इतका भयानक होता कि,तरुणाच्या देहाचे एकुण चार तुकडे झाले होते.मात्र टिपरचालकाने टिपर काही अंतरावर नेऊन पळून गेला.खबर मिळताच अंमळनेर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन छिन्नविछिन्न देहाचे तुकडे जमा करून डोंगरकिन्ही येथिल आरोग्य केंद्रात शवविच्छेदन केले.

अपघातात मृत्यू झालेले तात्याराम मांडवे हे घरातील कर्ते होते.शेती करत आहेत त्यांना दोन मुले व एक मुलगी आहे.ते दोन्ही शिक्षण घेत आहेत वृद आई,पत्नी असा परिवार आहे.



### स्मशानभूमी नसल्याने अडचण

शवविच्छेदन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जोरदार पाऊस सुरू झाला.मांडवेवाडी येथे स्मशानभूमीची व्यवस्था नसल्याने अंत्यविधी ची अडचण येत आहे.तसे पहाता डोंगरकिन्ही परिसरातील कोणत्याही वाडीवस्तीवर स्मशानभूमीची व्यवस्था नाही.सरपंच आण्णासाहेब येवले हे यासाठी प्रयत्न करत आहेत.

# परळीत प्रबोधनसत्राचे आयोजन

**उपक्रम:** सत्यशोधक केळुसकर गुरुजींची जयंती

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

सत्यशोधक दादा कृष्णाजी अर्जुन केळुसकर गुरुजी यांच्या १६४ व्या जयंती निमित्त परळी येथील लोकनेते गोपीनाथराव मुंडे पत्रकार भवनात २५ ऑगस्ट रोजी प्रबोधन सत्राचे आयोजन केले असून मुख्य वक्ते म्हणून फुले- आंबेडकरी अभ्यासक उद्बोधक चेतन निसर्गंध हे असणार आहेत.

सविस्तर माहिती अशी कि रविवार दि २५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वा. सत्यशोधक दादा केळुसकर गुरुजी: एक आदर्श शिक्षक या विषयावर होत असलेल्या प्रबोधन सत्राची अध्यक्षता पत्रकार प्रा प्रवीण फुटके हे भूषविणार आहेत, चर्चासत्राचे उद्घाटक पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे तर प्रमुख पाहुणे म्हणून उपकार्यकारी अभियंता श्रीकांत इंगळे ,सपोनि प्रवीण जाधव, कल्याण अधिकारी शरद राठोड, ज्येष्ठ साहित्यिक पत्रकार रानबा गायकवाड, विचारवंत ए तु कराड , लक्ष्मण वैराळ, विनोद उंबरे, नवनाथ दाणे,आदीची उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहान स्टुडन्ट फॉर रिकन्स्ट्रक्शन ऑफ सोसायटी व फुले - आंबेडकरी अभ्यास समूहचे भगवान साकसमुद्रे आणि परळी तालुका व शहर पत्रकार संघाच्या वतीने नितीन ढाकणे, जगदीश शिंदे, अभिमान मस्के, आकाश देवरे, महेश मुंडे, सम्राट गित्ते आदींनी केले आहे.



# सुस्त प्रशासन अडीज वर्षाने खडबडून जागे

सडेतोड: पुण्यभूमीच्या बातमीचा दणका



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

दैनिक पुण्यभूमीला बातमी आली आणि केजचे नगरपंचायत प्रशासन खडबडून जागेझाले आणि युद्धपातळीवर घाणीचे साम्राज्य हटवण्यासाठी तीव्र हालचालीला वेग आला. याबाबत सविस्तर वृत्तांत असा की दिनांक २१/०७/२०२४ या दिवशी प्रभाग १६ मध्ये काँग्रेसचे शहर अध्यक्ष ताहेर कुरेशी यांनी मागासवर्गीय वस्तीमध्ये घाणीचे साम्राज्य ज्या ठिकाणी होते त्या ठिकाणी एक बॅनर लावले त्या बॅनर वरती केज नगरपंचायत आणि यश कंट्रक्शन यांच्या नावावरती चपलांचा हार घालून जाहीर निषेधाचे बॅनर लावले. या अनुषंगाने आलेली दैनिक पुण्यभूमी मध्ये बातमी याचा दणका प्रशासनाने ध्यास घेतला व आज २२ ऑगस्ट रोजी केज नगरपंचायतचे प्रशासन सदरील ठिकाणचे घाणीचे साम्राज्य काढण्यासाठी त्या जागेवरती दाखल होऊन स्वच्छता करण्यास सुरुवात केली आहे. तसेच सदरील स्वच्छता हि स्वच्छ होण्यासाठी दोन ते तीन दिवसांचा वेळ लागणार असल्याचे कळते. या आगळ्यावेगळ्या आंदोलनामुळे काँग्रेसचे शहराध्यक्ष ताहेर खुरेशी केज शहरातील जनतेच्या चर्चेत आले आहेत. व त्यांच्या आगळ्यावेगळ्या आंदोलनाची सर्व केज शहरात जोराची चर्चा सुरू आहे.

# शैक्षणिक परिसरात टवाळखोरांची धुमस्टाईल

**पोलिसांचे दुर्लक्ष:** शालेय मुलांसह जीव टांगणीला

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील शाळा, महाविद्यालयाच्या परिसरात विद्यार्थी ये-जा करण्याच्या वेळेत रस्त्यावर विना क्रमांकाच्या दुचाकी धुमस्टाईल ट्रिपलसीट दामटणा-या टवाळखोरांचे प्रमाण वाढले आहे. वाहन परवाना नसतानाही काही बेजबाबदार पालक दिवट्यांच्या हातात महागडी वाहने देत असल्याने अपघाताचा धोका वाढला असून, शालेय मुले, निरपराध पादचा-यांचा जीव धोक्यात आला आहे. पोलिसांनी अशा सडकछाप टवाळखोरांचा बंदोबस्त करण्याची मागणी पालक वर्गातून होत आहे.

आष्टी तालुक्यातील कडा परिसरात शाळा महाविद्यालयाची संख्या अधिक असल्यामुळे आजूबाजूच्या गावातून शिक्षणासाठी येणा-या मुलींची संख्या मोठी असल्याने शाळा, महाविद्यालयाचा परिसर नेहमीच गजबजलेला असतात. मात्र मागील काही दिवसापासून याच शाळा, महाविद्यालयाच्या परिसरात मुलींच्या छेडछाडीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने पालक त्रस्त झाले आहेत. आष्टीसह कडा येथे शाळा, महाविद्यालय व खाजगी क्लासेसच्या परिसरात सडकछाप मजनूंची धुमस्टाईल स्टंटबाजी वाढली आहे. सुसाट धावणा-यांमध्ये काही दुचाकी विना कागदपत्र व क्रमांकाच्या आहेत. तर यामध्ये काही दुचाकी चोरीच्या असूनही सर्रास रस्त्यावर धावत आहेत. त्यामुळे पोलिसांनी अशा वाहनांची कागदपत्रे पडताळणी करण्याची मोहीम राबवण्याची गरज आहे. सुसाट धावणा-या ट्रिपलसीट दुचाकींमुळे टगेगिरी वाढली आहे. बसस्थानक, डॉ. आंबेडकर चौक, केरुळ चौक, कन्या शाळा, गांधी महाविद्यालय, धोंडे महाविद्यालयाच्या परिसरात नाहक निरपराध शालेय मुलांसह पादचा-यांच्या जिवाला नाहक धोका निर्माण झाला आहे. बहुसंख्य टवाळखोर नियमित शाळा, महाविद्यालयाच्या वेळेतच मुलींची छेडछाड करण्याच्या उद्देशाने दुचाकीला फुटके सायलंन्सर बसवून कर्कश हॉर्नचा आवाज करीत घिरट्या घालत असतात. यापैकी ब-याच टग्यांकडे दुचाकी वाहनाचा परवाना व कागदपत्रे नसलेली चोरीची वाहने आहेत. त्यामुळे पोलिसांनी शाळा, महाविद्यालयाच्या परिसरात धुमस्टाईल धावणा-या सडकछाप टवाळखोरांचा तात्काळ बंदोबस्त करावा. अशी आग्रही मागणी पालकांसह शाळा प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# विषमतेविरुद्ध आझाद क्रांती सेनेचा लढा

**राजेश घोडे :** शाखा लोकार्पण सोहळा

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी तालखेड फाटा व वारोळा तालुका माजलगाव जिल्हा बीड येथे आझाद क्रांती सेनेच्या शाखेची स्थापना करण्यात आली या या शाखा उद्घाटन प्रसंगी आझाद क्रांती सेनेचे सेना प्रमुख राजेश जी घोडे शहराध्यक्ष माजलगावअखिल बिल्डर युवा नेते आझाद क्रांती सेना अशोकजी ढगे तसेच तुकाराम जी शिंदे नेते आझाद क्रांती सेना टाकरवन सर्कल अध्यक्ष परमेश्वर गायकवाड यांनी आझाद क्रांती सेनेच्या शाखेची रिबीन कापून उद्घाटन झाल्याचे जाहीर केले.

सामाजिक आर्थिक राजकीय शैक्षणिक समानता देशांमध्ये आणण्यासाठी आझाद क्रांती सेना चळवळ उभा करत आहे या चळवळीच्या लढ्यामध्ये तळागाळातील अपेक्षित माणसाने उतरले पाहिजे असे विचार आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश घोडे यांनी मांडले यावेळी अशोकजी ढगे तुकाराम शिंदे व परमेश्वर गायकवाड ओमकार गायकवाड वरदान गायकवाड यांनीही मनोगत व्यक्त केले.




आझाद क्रांती सेनेचे वारोळा शाखाध्यक्ष बळीराम गायकवाड उपाध्यक्ष सुरज गायकवाड सचिव पांडुरंग कांबळे सहसचिव संतोष गायकवाड संघटक करण कारके सल्लागार विष्णू गायकवाड कोषाध्यक्ष मारुती गायकवाड चिटणीस नवनाथ गायकवाड सहसंघटक आप्पाराव गायकवाड सह सल्लागार अमोल गायकवाड अजय गायकवाड नितेश गायकवाड गोविंदा गायकवाड साहिल गायकवाड कृष्णा नाटकर गणेश गायकवाड अर्जुन गायकवाड महेश गायकवाड वरदान कारके रोहित कारके आदी आझाद सैनिक उपस्थित होते

# बदलापूर घटनेत फाशी देण्याची मागणी

**आक्रमक:** तहसीलदारांना राष्ट्रवादीचे निवेदन

गेवराई/ पुण्यभूमी प्रतिनिधी

बदलापूर येथील बालिकांवरील अत्याचाराचा निषेध करत त्या नराधामास फाशी देण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी शरद पवार गट यांनी तहसीलदारांकडे केली आहे. दोन बालिकांवर अमानुषपणे अत्याचार झाला, ज्या नराधामाने अत्याचार केला तो त्याच शाळेतील कर्मचारी आहे. याप्रकरणी तातडीने निर्णय घेत त्यांना फाशीची शिक्षा द्यावी तरच दोन्ही बालिका व त्यांच्या परिवाराला न्याय मिळेल असे राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. या घटनेचा निषेध करत तहसीलदार संदिप खोमणे यांना निवेदन दले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे तालुकाध्यक्ष आण्णासाहेब राठोड, दत्तात्रय येवले, शहराध्यक्ष सय्यद अख्तर, राम नाना राठोड, सुभाष महाराज, रवी जाधव, रमेश जाधव, मनोज डेगळे, विलास राठोड, सतोष जाधव, सतिष जाधव, शेख शोहेब, इब्राहीम शेख, शेख इर्शीद भाई, सय्यद जोहान, बाळासाहेब राठोड, अभिजीत राठोड, राहुल राठोड, संजय चव्हाण, ज्ञानेश्वर राठोड, अप्पी राठोड, संकेत जाधव, प्रवीण जाधव व गेवराई तालुक्यातील राष्ट्रवादीचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.



**समस्या** ढिसाळ नियोजनाचा सर्वांनाच फटका

# महामार्गाचे काम अतिशय कासवगतिने

पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

सन २०२० ला सुरू झालेले संभाजीनगर ते पैठण या राष्ट्रीय महामार्गाचे काम अत्यंत कासव गतीने सुरू असून संभाजीनगर महामार्गावरील नक्षत्रवाडी,चितेगाव, बिडकिन आणि ढोरकिन या सर्व मोठ्या लोकसंख्येच्या गावातील शाळा, दवाखाने, ग्रामपंचायत इमारती आणि वैयक्तिक घरे मोठ्या प्रमाणात समस्याग्रस्त झाले असून बिडकिनचे सरस्वती भुवन विद्यालय आणि ढोरकिन ची जि.प.शाळा सह ढोरकिन ग्रामपंचायत मोठ्या संकटात सापडली असून अत्यंत धोक्याच्या वळणावर आहे.

पैठण ते छत्रपती संभाजीनगर महामार्गावर सर्वाधिक नुकसान ढोरकिन या गावचे झाले असून या नुकसान भरपाई बद्दल कुठे दाद मागावी यांचा थांगपत्ता हे अधिकारी लागू देत नाहीत.ढोरकिन गावच्या जय किसान मोटार रिवायडींग च्या वळणावर शेकडो अपघात झाले असून अनेकांचा बळी या ठिकाणी गेलेला आहे.जय किसान वळण आणि कोलते हॉस्पिटल या ठिकाणी रोज एक अपघात होतोय .या वळणावर छत्रपती संभाजीनगर ची समांतर पाईप लाईन गेलेली असून त्यासाठी सोळा फुट रूंद व विस फुट खोल चर खाणून ठेवलेले आहेत.



अशातच गेल्या दोन दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्याने या घरात पाणी साठले असून त्यामुळे या चराची खोली कळत नाही आणि मोकाट कुत्रे व जनावरे यात पडतात.तरीही संभाजीनगर महापालिका आयुक्त आणि राष्ट्रीय महामार्गाचे मुख्य कार्यकारी अभियंता यांनी तातडीने घटनास्थळी भेट देवून पाहणी करावी. तसेच या कासव गतीने सुरू असलेल्या कामाला गती द्यावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.

### ...अन्यथा आंदोलन छेडणार

समांतर जलवाहिनीचे खोदकाम आणि राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम हे अतिशय मनमानी पद्धतीने गुत्तेदार व सरकारी अधिकारी अभियंता यांच्या सोयीनुसार सुरू आहे.संभाजीनगर ते पैठण अंतरावर ग्रामस्थांनी आपली घरे, मंदिरे, उदरनिर्वाह करणारी शेती ह. दिली आहे. मात्र ग्रामस्थांच्या त्यागाची जाणीव शासकिय यंत्रणांनी धरली नाही . त्यामुळे आम्ही ढोरकिन ग्रामपंचायतीच्या वतीने ग्रामस्थ संभाजीनगर महानगरपालिका आणि राष्ट्रीय महामार्गाचा निषेध करतो. लवकरच लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा रावसाहेब नाडे ढोरकिन (ग्रामपंचायत सदस्य) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळ सदस्य मुंबई तथा पैठण तालुका काँग्रेस अनुसूचित सेल यांनी दिला आहे.

# जरंडीमध्ये लाभार्थ्यांची गर्दी

**बोंबला:** सोयगाव ऐवजी जरंडी गावलाच तालुक्याचे स्वरुप



जरंडी/पुण्यभूमी प्रतिनिधी

शासनाच्या विविध योजनांची लाभ घेण्यासाठी शुक्रवारी जरंडीत वीस गावातील लाभार्थ्यांची मोठी गर्दी पहावयास मिळाली यामुळे जरंडीत रोजच नागरिकांची गर्दी होत असल्याने तालुक्याचे स्वरुप प्राप्त झाले आहे जरंडी परिसराला वीस खेडे लागून आहे सोयगावला जाऊनही तालुका स्तरिय अधिकारी भेटत नसल्याने या वीस गावातील नागरिकांनी जरंडीत जावुन ऑनलाइन संचिका दाखल करणे पसंद केले आहे त्यामुळे जरंडीत नेहमी गर्दीचा उच्चाक दिसून येत आहे शुक्रवारी आठवड्याचा शेवटच्या दिवशी मात्र गर्दीने सोयगावचा विक्रम मोडला आहे

जरंडी गावात जिल्हा मध्यवर्ती बँक ग्रामीण बँक यासह मंडळ तलाठी सज्जा ग्रामसंसद कार्यालय असून सध्या शासनाच्या विविध योजनांची महापूर सुरू आहे यामध्ये कृषी, पंचायत समिती, महसूल, या यंत्रणा मधील योजना मोठ्या प्रमाणावर सुरू असून तालुक्यावर सोयगाव ला जाऊनही अधिकारी व कर्मचारी भेटत नाहीत आणि भेटले तर लाभाच्या रक्कम पेक्षा अधिक पैशाची उकळणी करतात त्यामुळे परिसरातील वीस गावातील नागरिकांनी थेट ऑनलाइन संचिका दाखल करण्याचा सपाटा सुरूकेल्याने जरंडी गावात वीस गावचे नागरिक शासकीय योजनेचा लाभाच्या संचिका दाखल करण्यासाठी येतात त्यामुळे या ठिकाणी तालुक्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

**सुविचार-** ध्येय साध्य करण्यासाठी समर्पण आणि संयम आवश्यक आहे.

# पैशाचे सोंग आणणार कसे....?


पूर्वीच्या काळी डाकूंच्या टोळ्या असायच्या, त्यापैकी काही टोळ्या धर्मादाय करायच्या, म्हणजे काय तर या टोळ्या परिसरातील श्रीमंत व्यक्ती, जमीनदार वगैरे लोकांच्या घरावर डाका घालायच्या आणि नंतर त्यापैकी काही लूट किंवा कधी कधी सगळी लूट गरिबांमध्ये वाटून टाकायच्या. अशा टोळ्यांच्या सरदाराला 'गरिबांचा मसिहा' वगैरे म्हटले जायचे. अशाप्रकारे खैरातीत मिळालेल्या धनाने त्या गरिबांचे काही दिवस किंवा वर्ष सुखात जायचे; परंतु या मदतीने त्यांची गरिबी कायमची दूर होत नसे. जमलेली किंवा मिळालेली पूंजी संपली की पुन्हा त्यांच्या समोर भुकेची भ्रांत उभी राहायची, त्यातच जवळ धन असताना काहीही काम करण्याची गरज नसल्याने कष्ट करण्याची त्यांची सवय नष्ट व्हायची, पुढे हे धन संपल्यावर कष्ट करून पोट भरणे त्यांना जड जायचे. हा संदर्भ आतादेखील थोड्या वेगळ्या स्वरूपात लागू होतोच. असलेली सत्ता टिकविण्यासाठी सरकारी तिजोरीचा दौलतजादा करण्याची वृत्ती अलीकडील काळात बरीच फोफावली आहे. पंतप्रधानांच्या भाषेत सांगायचे तर 'रेवडी' योजनांची भरमार निवडणुकीच्या काळात केली जाते. अशा प्रकारे प्रलोभन देणाऱ्या योजनांची आपल्याच पंतप्रधानांनी 'रेवड्या वाटणे' या शब्दात खिल्ली उडविली होती आणि त्यांनीच लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर कोरोना काळात सुरू झालेली रेशनवरील मोफत धान्य योजना अजून पाच वर्षे सुरू ठेवण्याची घोषणा केली. कोरोना काळात लोकांच्या हाताला काम नव्हते त्यामुळे सरकारने त्यांना रेशनवर मोफत धान्य दिले; परंतु आता तशी परिस्थिती नाही. कष्ट करून लोक पोट भरू शकतात; परंतु लोकांना असलेले मोफत योजनांचे आकर्षण लक्षात घेऊन मोदी सरकारने अजून पाच वर्षे मोफत धान्य पुरवठा सुरू ठेवला. अर्थात हे एकच उदाहरण नाही. राज्याराज्यांमध्ये निवडणुका तोंडावर आल्या की सरकारकडून सरकारी तिजोरीची दारे सताड उघडली जातात. सगळेच आपल्या मतदारांना खूश करण्यासाठी खिरापती वाटायला सुरुवात करतात; परंतु अशा खिरापतींनी तेवढ्यापुरते पोट भरत असले तरी प्रश्न कायमचे सुटत नाही, हे लोकांना कळायला हवे आणि त्यापेक्षा अधिक जनतेच्या कल्याणाचा वसा घेतलेल्या सरकारमधील नेत्यांना कळायला हवे. निवडणूक जवळ आली की हमखास शेतकऱ्यांसाठी काही तरी मोठ्या घोषणा होतात. यापूर्वी शेतकऱ्यांचे कर्ज अनेक राज्यांनी माफ केले आहे, शिवाय त्यांना वीज, पाणीदरात भरपूर सवलत देण्याची घोषणा होते. एवढे सगळे करूनही शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबत नाहीत त्यामागची कारणे शोधण्याची गरज कुणाला वाटत नाही. मूळ रोगावर उपचार करण्यापेक्षा भलतीकडेच औषधाचा मारा केला जातो. इतके वर्ष प्रयत्न करूनही मागास समाजाचे मागासलेपण कमी का होत नाही, याचा विचार करण्याऐवजी निवडणुकीच्या तोंडावर वेगवेगळ्या समाजासाठी तकलादू आरक्षणाच्या घोषणा केल्या जातात, पुढे त्या घोषणांचे बेगडीपण उघडे पडतेच. सरकारला, मग ते कुणाचेही असो, कोणत्याही विचारधारेचे असो, मूळ समस्या समजून घ्यायचीच नसते. आता लाडकी बहीण, लाडका भाऊ, लाडका अमुक अशा घोषणा चालू आहेत. हे सरकारी तिजोरी रिकामी करण्याचे उद्योग आहेत. एकीकडे प्रत्येक राज्य सरकारवर हजारो कोटींचे कर्ज आहे, अन् त्यासाठी हजारो कोटींचे व्याज भरावे लागत असताना, अशा घोषणांसाठी पैसा येतो कुठून हा प्रश्न कुणालाच पडत नाही. तुटीच्या अर्थसंकल्पामध्ये पैशाचे फुकट वाटप कसे शक्य आहे याचा खुलासा सरकार करीत नाही. हे फुकट वाटप करायचे असेल तर नवे कर्ज उभे करणे हाच एक मार्ग आहे आणि त्या कर्जाचे, त्यावरील व्याजाचे हप्ते शेवटी सामान्य लोकांकडून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या वसूल केल्या जाणाऱ्या करातूनच भरले जातात. हा प्रकार सातारा लुटून कोल्हापूरला दान करण्यासारखाच आहे. शेवटी सगळी सोंगे आणता येतात पण पैशाचे सोंग आणता येत नाही. सरकारला लोकांची मदत करायचीच असेल तर त्यांच्या हाताला काही तरी काम द्यावे आणि त्या मोबदल्यात त्यांना पैसा पुरवावा. आज सरकारी आणि गैरसरकारी कार्यालयांमध्ये प्रचंड प्रमाणात मनुष्यबळाचा तुटवडा आहे, त्याचा परिणाम त्या त्या विभागाच्या कार्यक्षमतेवर होत आहे. या सगळ्या जागा लाडक्या बहिणींना उपलब्ध करून दिल्या, आवश्यक असेल तिथे त्यांना त्यासाठी प्रशिक्षण दिले तर त्यांच्या सोबतच त्यांच्या कुटुंबियांचा जगण्याचा प्रश्न सुटू शकतो. शिवाय काम, रोजगार देऊन मानधन, पारिश्रमिक दिले तर या बहिणींना आपण कष्टाचे पैसे मिळवितो याचे समाधान लाभेल. सरकारकडून पैसा फुकट घेतल्याची लाजही वाटणार नाही. घातल्या पाण्याने गंगा वाहत नाही, हे सगळ्यांना कळते; परंतु निवडणुकीच्या तत्कालिक फायद्यामुळे ते वळत नाही, हेच खरे.

# शक्तिप्रदर्शन टळले....!

बदलापूरच्या घटनेचा निषेध करण्यासाठी महाविकास आघाडीने शनिवारी 'महाराष्ट्र बंद'चे आवाहन केले होते. अत्यावश्यक सेवा वगळून इतर सगळ्यांनी या बंदमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन विरोधकांनी केले होते. त्यातही उद्धव ठाकरे याबाबतीत अधिक आक्रमक होते. हा बंद शंभर टक्के यशस्वी करण्याचा चंग त्यांनी बांधला होता. त्यातूनच त्यांनी मुंबईतील लोकल आणि बस चालकांना बंदमध्ये सहभागी होण्याचा आग्रह धरला होता, एवढेच नव्हे तर पोलिसांनीही बंद समर्थकांना मदत करावी, असे त्यांचे म्हणणे होते. हा बंद राजकीय नसून नागरिकांच्या संतप्त भावनांचे ते उत्स्फूर्त प्रगटीकरण असेल असे त्यांचे म्हणणे होते. अर्थात या बंदच्या माध्यमातून महाविकास आघाडीला आणि त्यातही उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला शक्तिप्रदर्शन करायचे होते. विषयाचे गांभीर्य आणि विरोधी राजकीय पक्षांची भूमिका पाहता हा बंद पूर्णपणे यशस्वी होण्याची शक्यता अधिक होती, बंदमध्ये सहभागी नसणे म्हणजे अशा कृत्याला आळा घालण्यात किंवा घटना घडल्यानंतर संबंधितांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न करणाऱ्या सरकारचे समर्थन ठरले असते, तशीच मांडणी उद्धव ठाकरेंनी केली होती. त्यामुळे फारसे प्रयत्न न करता हा बंद शंभर टक्के यशस्वी ठरला असता आणि त्यातून अप्रत्यक्षपणे विरोधकांचे मोठे शक्तिप्रदर्शनही झाले असते; परंतु उच्च न्यायालयाने हा बंदच बेकायदेशीर ठरविल्याने विरोधकांची थोडी गोची झाली. शरद पवारांनी तात्काळ उच्च न्यायालयाचा आदेश मान्य करीत बंदचे आवाहन मागे घेतले. काँग्रेसनेही त्यांच्या भूमिकेला पाठिंबा दिला. या दोन्ही पक्षांनी बंदमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्याने उद्धव ठाकरेंकडे दुसरा पर्याय उरला नाही. आता विरोधी पक्षाचे लोक काळ्या फिती लावून निदर्शने करणार आहेत, अर्थात या निदर्शनांनाही परवानगी मिळते की नाही याबाबत स्पष्टता नाही; परंतु एक बाब मात्र स्पष्ट आहे की शक्तिप्रदर्शन करून आपली ताकद सरकारला दाखवून देण्याची एक संधी विरोधकांच्या हातून गेली. बंद वर बंदी घालण्याचा उच्च न्यायालयाचा निर्णय तत्कालिक आहे की भविष्यातही राजकीय पक्षांना बंदचे आवाहन करता येणार नाही, याचा फैसला आता कदाचित सर्वोच्च न्यायालयातच होईल.

## लोकनामा

# हिंडनबर्ग अहवालाची शेअर बाजारावर छाया...!



भूपेंद्र गणवीर
9834245768
ज्येष्ठ पत्रकार, नागपूर.

हिंडनबर्ग रिपोर्ट आला. अदानी ग्रुपच्या शेअर आर्थिक गुन्हेगारी प्रकरणाचा स्फोट झाला. ते प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. या प्रकरणाची चौकशी सेबी अध्यक्ष माधवी बूच यांच्याकडे होती. त्यांचा चौकशी अहवाल सर्वोच्च न्यायालयास सादर करण्यात आला. त्या आधारे अदानी ग्रुपला न्यायालयाने क्लीन चिट दिली. सेबी ही शेअर बाजारावर निगराणी करणारी, तसेच गैरप्रकारांना आळा घालणारी संस्था आहे. त्या संस्थेच्या चौकशी अहवालावर सर्वोच्च न्यायालयाने विश्वास ठेवला. आता हिंडनबर्ग रिसर्चने सेबी अध्यक्षावरच ठपका ठेवला.

हिंडनबर्ग रिपोर्ट आला. शेअर बाजारात फसवाफसवी नको, गैरप्रकार वेळीच रोखता यावे, यासाठी भारतीय शेअर व विनिमय मंडळ (सेबी) आले. ते बाजारावर नियंत्रण ठेवू लागले. या सेबीवर रक्षकच भक्षक निघाल्याचा ठपका हिंडनबर्ग अहवालात केला. त्यावरून जगात गदारोळ माजला. सरकार तज्ज्ञ नेमणुकीच्या नावावर संघ-भाजपाची माणसं घुसवित आहे. त्या माणसांवरच भ्रष्टाचाराचे आरोप होत आहेत. त्याचा नमुनेदायक दाखला सेबी अध्यक्ष माधवी बूच यांचा आहे हे शेअर घोटाळ्याने उघड झाले. तज्ज्ञ म्हणून विविध विभागांत केलेल्या नियमबाह्य नियुक्त्या रद्द व्हाव्यात. सरकारी सोयी, सवलती, भक्कम वेतन लाटावयाचे अन् पदाच्या आड तिजोरी भरण्याचे काम खटकते. आता हेच बघा शेअर बाजार विश्वासाचा, श्रीमंतांच्या सहभागाचा, अतिशय जोखमीचा, जमला तो मालामाल, बिघडला तो रस्त्यावर आला. या बाजाराने श्रीमंतांमध्ये आकर्षण वाढले. परिणामी शेअर बाजार श्रीमंतांचा व्यवसाय बनला. त्या जोरावर तो फुलला, फळला. या व्यवहारात भारतातील १४२ कोटी जनतेपैकी केवळ तीन टक्के लोकांची गुंतवणूक आहे. तीसुद्धा श्रीमंतांची असते. ही गुंतवणूक अमेरिकेत २७ टक्के, तर चीनमध्ये १० टक्के आहे. त्या शेअर चढ-उताराचा परिणाम त्या-त्या देशाच्या आर्थिक आरोग्यावर पडतो. बँका आणि आर्थिक गुंतवणूकदार संस्थांवर पडतो. त्यामुळे शेअर घोटाळ्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. अलीकडे मध्यमवर्गीयातील नवश्रीमंत तरुण वर्ग म्युच्यूअल फंड गुंतवणुकीकडे वळला. त्यात प्राध्यापक, डॉक्टर, अंभियत्यांची भर पडली. यात सहा टक्के लोक गुंतवणूक करू लागले. घोटाळ्यांमुळे त्यांना अनेकदा आर्थिक फटके बसले. सामान्य व मध्यमवर्गीयांपैकी ९५ टक्के लोक आपल्या बचतीचा पैसा मुदत ठेवी, भविष्यनिधी, आयुर्विमा आदी बचत योजनांमध्ये गुंतवणूक करतात. सरकारने दहा वर्षांत त्यावरील व्याज दर घटविले. अलीकडे बचत ठेवी घटल्या. कर्ज घेणारे वाढले. या असमतोलाने देशाच्या अर्थमंत्री चिंतित आहेत. त्यात नवे हिंडनबर्ग अहवालाचे वादळ आले.


मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी. या राजधानीत दोन मोठे शेअर बाजार आहेत. त्या बाजारांचे विदेशी गुंतवणूकदारांनासुद्धा आकर्षण असते. त्यापैकी बॉम्बे स्टॉक एक्सचेंज (बीएसई) ९ जुलै-१८७५ मध्ये स्थापन झाला. जगातला दहाव्या क्रमांकाचा आहे, तर आशियातील सर्वात जुना स्टॉक एक्सचेंज आहे. तिथे रोज ५० हजार कोटी ते ७० हजार कोटी रुपयांची उलाढाल होते. देश-विदेशातील शेअर दलाल देवाण-घेवाणीचे व्यवहार करतात. त्यात लहान-मोठ्या ५ हजार ७४९ कंपन्यांची नोंद आहे. नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एनएसई) जगातला सर्वात मोठा शेअर मार्केट आहे. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये एनएसईची इमारत आहे. मुंबईतील या दोन शेअर बाजारांनी मुंबईला सन्मान मिळवून दिला. हर्षद मेहता यांनी १९९२ च्या सुमारास पहिला घोटाळा केला. तो जगभर गाजला. भारतीय वृत्तपत्रांनी या घोटाळ्याचे अनेक रसभरीत वृत्त छापले. हर्षद मेहताला अटक झाली. जेलमध्ये जावे लागले. तो दगावला. तरी हर्षद मेहता शेअर घोटाळा आजही लोकांच्या स्मरणात आहे. त्यानंतर उघडकीस आलेला २०२३-२४ चा मोठा घोटाळा होय. या घोटाळ्यावर पडदा टाकण्याचा प्रयत्न आहे. विरोधी पक्ष सांसदीय समितीमार्फत चौकशीची मागणी करतो. सरकार त्या चौकशीला का घाबरतो? 'घपला नही तो काहेका डर.' होऊ द्या 'दुध का दुध, पानी का पानी'. येऊ द्या सरकारी कामकाजात पारदर्शिकता.

अमेरिकन शॉर्ट सेलर हिंडनबर्ग रिसर्च या संस्थेचा जगभर दबदबा आहे. या संस्थेने भारतातील शेअर बाजार घोटाळा उजेडात आणला. त्याचा पहिला रिपोर्ट २४ जानेवारी-२०२३ रोजी आला. कागदी कंपन्यांच्या माध्यमातून कसा शेअरचा गोरखधंदा चालतो, हे चव्हाट्यावर आणले. त्या अहवालाने खळबळ माजली. अदानींच्या कंपन्यांचे शेअर्स धडाधड कोसळले. शेअर बाजारालासुद्धा झटका बसला. त्यातून अदानी ग्रुप सावरत असताना तब्बल १८ महिन्यांनी दुसरा रिपोर्ट आला. या रिपोर्टमध्ये शेअर व्यवहाराची चौकशी करणाऱ्या सेबी अध्यक्ष माधवी बूच आणि धवल बूच या दाम्पत्याला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. या धमाक्याचा सुगावा सरकारला अगोदरच आला असावा. त्यामुळे संसदेचे अधिवेशन तडकाफडकी गुंडाळण्यात आले, असा विरोधी पक्षांचा आरोप आहे. संसदेत सेबी प्रकरण येणार, गदारोळ होणार, सरकारला उत्तर देणे जड जाणार, याची जाणीव असावी या आरोपात दम दिसतो.

हिंडनबर्ग रिपोर्ट आला. अदानी ग्रुपच्या शेअर आर्थिक गुन्हेगारी प्रकरणाचा स्फोट झाला. ते प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. या प्रकरणाची चौकशी सेबी अध्यक्ष माधवी बूच यांच्याकडे होती. त्यांचा चौकशी अहवाल सर्वोच्च न्यायालयास सादर करण्यात आला. त्या आधारे अदानी ग्रुपला न्यायालयाने क्लीन चिट दिली. सेबी ही शेअर बाजारावर निगराणी करणारी, तसेच गैरप्रकारांना आळा घालणारी संस्था आहे. त्या संस्थेच्या चौकशी अहवालावर सर्वोच्च न्यायालयाने विश्वास ठेवला. आता हिंडनबर्ग रिसर्चने सेबी अध्यक्षावरच ठपका ठेवला. चौकशी अहवालावर प्रश्नचिन्ह उभे केले. माधवी बूच यांचा पैसा ऑफशोर कंपनीच्या माध्यमातून स्टॉक मूल्यात हेराफेरी केली. त्यात सेबी अध्यक्ष व विनोद अदानींवर संगनमताचा आरोप केला. त्यांचा बूच-अदानी दाम्पत्याने इन्कार केला आहे. जी गुंतवणूक आहे ती सेबीत येण्याअगोदरची असल्याचे नमूद केले. या नवीन प्रकरणाने पुन्हा एक नवे वादळ उठले. ते देशभर घोंगावत सुटले. या प्रश्नावर विरोधी पक्षांनी स्पष्ट भूमिका घेतली. सांसदीय समितीमार्फत चौकशीची मागणी केली. सेबीच्या प्रामाणिकतेवर संशय घेतला. सेबीची विश्वसनीयता धोक्यात आली. हिंडनबर्ग अहवालामुळे अर्थव्यवस्थेवर प्रश्न निर्माण होत असतील, तर त्याकडे दुर्लक्ष करून कसे चालणार.

## वास्तव

# जात वास्तव; विस्तवाने न जळणारे!



जीवन गावंडे
7350442920

आज शिक्षित बुद्धीजीवी वर्गाची जबाबदारी मोठी आहे. त्यांनी बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला मार्ग अवलंबला तर निश्चितच एका आदर्श समाजाची निर्मिती शक्य आहे. जात ही केवळ विस्तवाने विझणारी वस्तू नाही. तिचा संबंध मानसिकतेशी असल्यामुळे आपल्याला मानसिक परिवर्तन घडवून आणावेच लागेल, त्याशिवाय तरणोपाय नाही.

अलीकडे जातीचा खुंटा वारंवार आणि जाणीवपूर्वक मजबूत करण्याचा प्रयत्न केला जात आहे. धार्मिक संघटनांचा हा जणू एक कलमी कार्यक्रमच आहे की काय, असे दिसून येते. इतकेच नाही तर लोकशाहीच्या सर्वच संस्था हे काम इमाने इतबारे करू लागल्या आहेत.

भारतातील समाज व्यवस्थेचा पाया जातीवाद आहे. प्रत्येक व्यक्तीला जीवन जगत असताना तिचा प्रत्यय आलेला आहे. जात ही मानव निर्मित आहे आणि तिचा संबंध मनाशी असल्यामुळे प्रत्येकाच्या मनात तिने घर करून ठेवले आहे. व्यक्ती उच्च जातीची असेल, तर ती आपल्यापेक्षा कमी दर्जाच्या जातीतील व्यक्तीकडून सन्मानाचा आग्रह करतो, तसा अधिकार समजतो. धर्मशास्त्रात तर काही जातींसाठी तसा दंडकच आहे. मनुस्मृतीची पाने चाळली, तर पानोपानी त्याचा प्रत्यय आपल्याला येईल. जातीची भावना जशी घट्ट झालेली दिसून येते, तसेच तिचा गर्व करणारी टोळकीसुद्धा वस्ती वस्तीत दिसून येतात. लोक आता जातीचे लेबल लावून मिरवायला लागले आहेत. असे वातावरण इथल्या व्यवस्थेसाठी पोषक आहे. जेव्हा कोणी आपल्या जातीचा विद्यार्थी, युवक, युवती विशेष प्रावीण्य प्राप्त करते तेव्हा त्या जाती समूहातील काही लोकांना प्रेमाचे भरते आलेले असते. 'आमच्या जातीचा' म्हणून त्या युवक किंवा युवतीचा गौरव केला जातो. देखी-देखी म्हणून प्रत्येकाला आपल्या जातीचा उमाळा येतो आणि बघता बघता उघड्या आकाशाखाली मुक्त विहार करणारा माणूस जातीच्या कोंडवाड्यात स्वतःला बंदिस्त करतो. पुढे आपल्या कंपूत आपण इतर जातीपेक्षा श्रेष्ठ कसे, याची चढाओढ आणि प्रदर्शनही करीत असतो. जातीची सभा-संमेलने, सत्कार, परिवार मेळावे घेऊन आपल्या जातीचे शक्ती प्रदर्शनही या माध्यमातून केले जाते. उत्तर भारतातील वस्ती वस्तीत ग्रेट चमार, ग्रेट जाट म्हणून लावलेले बॅनर हे शक्तिप्रदर्शन म्हणायचे नाही तर काय म्हणायचे? आता याच मानसिकतेचे महाराष्ट्रातसुद्धा उदंड पीक घेतले जात आहे. ही मानसिकता जातिव्यवस्था मजबूत करणारी आहे. तिला पुढे करणारे म्होरके आणि तिचे तुष्टीकरण करणाऱ्या संस्था कोणत्या आहेत, याचा शोध घेणे आवश्यक आहे, कारण हा मामला केवळ गाव-शहरातला नाही. ही बाब राष्ट्र निर्मितीसाठीसुद्धा घटक आहे. आता तर या बिमारीची लागण संसदेमध्येसुद्धा झाली आहे.

संसदेमध्ये राहुल गांधींच्या जातगणनेला भाजपने कडाडून विरोध केला. भाजपचे म्हणणे आहे, की काँग्रेस जातीच्या आधारावर देशात फूट पाडण्याचे कारस्थान करत आहे. इतकेच नाही तर भाजपच्या अनुराग ठाकूर यांनी 'ज्यांना स्वतःची जात माहीत नाही...' असे संबोधून राहुल गांधी यांचे नाव न घेता डिवचले आहे. यापूर्वी काँग्रेसचे मल्लिकार्जुन खर्गे यांनी 'आर्य बाहरसे आये है, हम यहाँ के मूलनिवासी है.' असे ठणकावत आर्यांना त्यांची जागा दाखवली होती. राजकीय पुढारी आता जातीवंत नेते म्हणून बघायला मिळतात, ही जाती व्यवस्थेची कमाल म्हणावी लागेल. थोडक्यात लोकांच्या मूलभूत अधिकारसंदर्भात चर्चा न होता केवळ जातीवर संसद आणि संसदेच्या बाहेर चर्चा केली जात आहे, हा प्रकार भयंकर आहे. जात ही राजकीय पटलावरची मुख्य सोंगटी आहे, एवढे मात्र खरे! जेवढे आपण जातीला कवटाळत राहू तेवढी विषमता मजबूत होईल. डॉ.बाबासाहेब जातीविषयी आपले मत व्यक्त करताना म्हणतात की, जात हे एक स्वतंत्र राष्ट्र आहे. तो तुमच्या मार्गात येणारा महाकाय राक्षस आहे, त्याचा खातमा केल्याशिवाय तुम्हाला तुमची राजकीय आणि आर्थिक सुधारणा करता येणार नाही. पुढे बाबासाहेब असेही म्हणतात की, जातीव्यवस्था हे फक्त श्रम विभाजन करत नाही. ते श्रमिकांचेही विभाजन करते. प्रगत समाजाला श्रम विभाजनाची निर्विवादपणे गरज असते; परंतु कुठल्याही प्रगत समाजात श्रम विभाजनासोबत श्रमिकांचे असे अनैसर्गिक कप्पेबंद विभाजन केलेले नाही. ही व्यवस्था श्रमिकांची केलेली ती श्रेणीबद्ध उतरंड आहे. जातिव्यवस्थेचा परिपाक असलेल्या व्यवसायांचे हे स्तरीकरण निश्चितच घातक आहे. जातिनिष्ठ श्रमविभाजन व्यक्तीच्या पसंतीवर आधारलेले असत नाही. व्यक्तिगत भावना, व्यक्तिगत पसंती याला त्यात स्थान नाही.'


सात लाख खेड्यांत वसलेल्या भारतात साडेसहा हजार जाती आहेत. या जातीत क्रमिक असमानता असल्यामुळे यांच्यात द्वेष भावना ठासून भरलेली आहे. व्यक्ती कितीही शिकला आणि मोठ्या हुद्यावर नोकरीला असला तरी तो भेदभाव करतो. याचा अर्थ केवळ पाठ्य पुस्तकी ज्ञानाने विवेकबुद्धी येते, असेही म्हणता येणार नाही किंवा जातीय मानसिकता नष्ट होणार, असेही म्हणता येणार नाही. केवळ आंतरजातीय विवाह किंवा आंतरिक भोजनाने जात नष्ट होत नाही. हा इतर मार्गापैकी एक छोटासा मार्ग आहे. जाती ज्या धार्मिक धारणेवर उभ्या आहेत, त्या धारणा नष्ट केल्या पाहिजेत, असे बाबासाहेब म्हणतात.

जेव्हा तुम्ही एखादी व्यवस्था नष्ट करता तेव्हा तुम्हाला पर्यायी व्यवस्था निर्माण करावी लागत असते. आज जातिव्यवस्था व्यक्तीच्या आणि देशाच्या अधोगतीस कारणीभूत ठरत आहे, तर मग आपण निर्माण करत असलेल्या समाजाची तत्त्व कोणती हे निश्चित झाले पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'आपण मला विचारले तर मी सांगेन की, माझा आदर्श समाज स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यावर आधारित असेल आणि का असू नये? बंधुत्वाला काय आक्षेप असू शकतो? मला तरी त्याची कल्पना करता येत नाही. आदर्श समाज परिवर्तनास अनुकूल असला पाहिजे, एका भागात होत असलेले बदल दुसऱ्या भागात पोहोचविण्यासाठी त्यात पुष्कळ मार्ग असावेत. आदर्श समाजामध्ये विविध हितसंबंध जाणीवपूर्वक एकमेकांपर्यंत पोहोचवून त्यात भागीदार होता आले पाहिजे'.

आज शिक्षित बुद्धीजीवी वर्गाची जबाबदारी मोठी आहे. त्यांनी बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला मार्ग अवलंबला तर निश्चितच एका आदर्श समाजाची निर्मिती शक्य आहे. जात ही केवळ विस्तवाने विझणारी वस्तू नाही. तिचा संबंध मानसिकतेशी असल्यामुळे आपल्याला मानसिक परिवर्तन घडवून आणावेच लागेल, त्याशिवाय तरणोपाय नाही.

## चळवळ

# आंबेडकरी विचार तेवत ठेवणारे लोककवी अर्जुन हरी भालेराव



प्रा.डॉ. इसादास भडके
9096364886
erbfes@gmail.com

लोककवी अर्जुन हरी भालेराव यांचा जन्म १ डिसेंबर १९०६ रोजी उस्मानाबाद जिल्ह्यातील कसबे तडवळे या गावी झाला. वर्गाच्या बाहेर बसून चौथीपर्यंतचे त्यांचे शिक्षण झाले. ते अभ्यासात हुशार होते. चौथीच्या परीक्षेत पहिला क्रमांक घेतल्यामुळे त्यांना चोवीस रुपयांची शिष्यवृत्ती मिळाली होती. प्रतिकूल परिस्थितीतून त्यांना वाटचाल करावी लागली. उदरनिर्वाहासाठी शिक्षकी पेशा त्यांनी पत्करला. तद्वतच या पेशात बऱ्यापैकी नाव कमावले. त्यांना मास्तर म्हणून सन्मान मिळू लागला. ते काव्यलेखन आणि गीत रचना करू लागले. लोककवी भालेराव यांच्या गावात म्हणजे कसबे तडवळे या गावी १९४१ साली डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली 'महार-मांग वतनदार परिषद' झाली. त्याचा परिणाम लोकमनावर झाला. लोककवी भालेराव या परिषदेने झपाटले. त्यांच्यावर या परिषदेचा जबरदस्त प्रभाव पडला आणि सर्वस्व आंबेडकरी चळवळीला समर्पित केले. आंबेडकरी विचारांच्या प्रचार आणि प्रसारासाठी शाहिरी रचना केली.

लोककवी भालेराव यांनी गुलामीला नकार देत शिक्षणाचे महत्त्व जाणत अस्पृश्यता नष्ट करण्याकरिता आपली लेखणी झिजवली. शोषणाविरुद्ध त्यांनी एल्गार पुकारला. रूढी आणि परंपरांना कापून काढण्याकरिता 'ज्ञान' या शस्त्राचा वापर करा, असे आवाहन ते करतात. बाबासाहेबांमुळे अंधार नष्ट होऊन नवे दिवस उगवले आहेत. ज्ञानाच्या माध्यमातून रूढी नष्ट करण्याकरिता ज्ञानशास्त्राचा उपयोग करा, असे विशद करताना ते म्हणतात की, 'आता अंधकार फाकडे हांऽहांऽहांऽ आता अंधकार फाकडे, नवे दिन उगवले समाजाचे। घ्यारे बोल ध्यानी भीमरायाचे जीऽ जी, ज्ञानशास्त्र मिळाले आपल्याला। परजा रूढी कापण्याला हांऽ हांऽ हां'.

समाजात जागृती व्हावी याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार स्वीकारणे आणि अंगीकृत करणे फारच आवश्यक असल्याची जाणीव लोककवी भालेराव करून देतात. आणि आंबेडकरी चळवळीची तीव्र जाणीव ते करून देताना म्हणतात, 'किती धमक्यांचा पूर वाहिला। भीती शिवली ना भीमाला, प्राणावरती उदार हो जाहला। दिला नवा उन्मेष समाजाला, गर्जा आता जयभीमाला। हो जीऽ जीऽ'.

लोककवी भालेराव चळवळविषयक आशावाद व्यक्त करतात, उत्साह निर्माण करतात आणि सम्यक विद्रोहाची मांडणी करताना म्हणतात की, 'मर्दानी पाऊल द्यावे। पवित्र्यात दंड थोपटावे, छातीचे डौल मारावे। मिशांचे पीळ भरावे, घ्यारे लाठीकाठी हाती। हुकूम भीमजीचा'. लोकात लढाऊ वृत्ती निर्माण करण्याचे मौलिक कार्य लोककवी भालेराव यांनी केले. शिक्षणाविषयी त्यांनी मांडलेले विचार लक्षात घेण्यासारखे आहेत. ते म्हणतात की, 'घराला वासा नसावा, पण मुलगा शाळेत असावा, करणीत खोटा मनाचा मोठा वैरी दारात नसावा, सुख-दुःखाची सांगू कोंडी, जुगार चावडीत नसावा। जुगारात झुकला प्राणास मुकला, विचार करणारा असावा हाऽ जीऽऽऽ'. शिक्षणाने माणूस चांगल्या मार्गी लागतो. वाईट व्यसनाने माणूस प्राणास मुकतो, असे प्रतिपादन लोककवी भालेराव यांनी केले आहे.

एकदा सुबैया आणि बी.एस. व्यंकटराव (हैदराबादी आंबेडकर) यांच्या उपस्थितीत लोककवी भालेराव यांच्या जलशाचा प्रयोग झाला. १४ जानेवारी १९४६ ला भालेरावांच्या जलसा मंडळीने 'महारकी वग' सादर केला होता. तो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बघितला होता. या कार्यक्रमाची डॉ. बाबासाहेबांनी प्रशंसा केली. त्यामुळे या जलसा मंडळीला लोकांनी डोक्यावर घेतले. इथल्या हिंदू रूढी, परंपरेवर टीका केल्यामुळे एकदा उमरगा तालुक्यातील कासारी गावी कार्यक्रमाला जाताना प्रवासात काळ- निंबास या गावी येताच हल्ला केला. त्यात ते बचावले. त्यांनी प्रासंगिक कविता, हैदराबाद मुक्ती संग्रामावर कविता लिहिल्या. त्यांच्या दोन दीर्घ 'भीम पाळणे' या रचना प्रसिद्ध आहेत. त्यांचा कवितांचा काळ हा बाबासाहेबांच्या हयातीचा होता. एकंदरीत आंबेडकरी चळवळीवर भाष्य करीत लोककवी भालेराव यांनी आंबेडकरी विचार तेवत ठेवला.

'मुक्ताई', आंबेकर लेआऊट,
पाण्याच्या टाकीजवळ, चंद्रपूर

## वाचक विचार मंच

### सावधान! सायबर चोरांचा नवा फंडा

दिवसेंदिवस सायबर गुन्हेगारीच्या घटनांमध्ये मोठी वाढ होत असून सायबर चोर नागरिकांची ऑनलाइन लुबाडणूक करण्यासाठी नवनवीन क्लृप्त्या शोधून काढत आहेत. इंटेलिजन्स ब्युरो, नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो, केंद्रीय अन्वेषण ब्युरो, इत्यादी केंद्रीय यंत्रणांच्या नावांचा गैरवापर करून नागरिकांना धमकावून, घाबरवून कोट्यवधी रुपयांना फसविले जात आहे. यात आता भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाची (ट्राय) भर पडली आहे. 'ट्राय'कडून कॉल केला जात असल्याचे भासवून नागरिकांची वैयक्तिक माहिती चोरण्याची नवी पद्धत सायबर चोरांनी सध्या शोधून काढली आहे. ट्रायच्या नावाखाली फसवे कॉल करून नागरिकांना वैयक्तिक माहिती देण्यास सांगितले जाते. माहिती न दिल्यास त्या नागरिकाचा मोबाईल क्रमांक डिसकनेक्ट केला जाईल, अशी धमकी या सायबर चोरांकडून दिली जाते. त्यामुळे अशी कोणतीही वैयक्तिक माहिती देण्यापूर्वी नागरिकांनी सावधगिरी बाळगण्याची सूचना ट्रायने केली आहे, तसेच अशा फसव्या कॉलची तक्रार फसव्या कॉलचे रिपोर्टिंग करणाऱ्या 'चक्षू' नावाच्या पोर्टलवर करावी, जेणेकरून फसवणूक करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करता येईल, असे आवाहन ट्रायने केले आहे.

**प्रदीप शंकर मोरे** मुंबई
मो. नं.: ९८७०७७७२७४

### सीएनजी गॅस प्रणाली आणि इलेक्ट्रिक चार्जिंग यांचा विस्तार करण्याची गरज!

आज देशात झपाट्याने वाहनांची संख्या वाढत आहे, त्याचप्रमाणे वायुप्रदूषणदेखील उग्र रूप धारण करत आहे. त्यामुळे जनतेला अनेक आजारांशी सामना करावा लागत आहे; मात्र यावर मात करण्यासाठी भारत सरकार आधुनिक तंत्रज्ञान वापरून सीएनजी गॅस आणि इलेक्ट्रिक वाहनांना चालना देण्यासाठी पुढे आले असून यासारख्या प्रोजेक्टमुळे हवेमधील प्रदूषण रोखण्यासाठी याची मोठ्या प्रमाणात मदत होणार आहे; पण सीएनजी गॅस प्रणाली आणि इलेक्ट्रिक वाहनांना चार्जिंग करण्यासाठी अतिशय तुटपुंजी सोय आहे. त्यामुळे यामध्ये अजून मोठ्या प्रमाणात सरकारला काम करावे लागेल. सीएनजी गॅस प्रणाली आणि इलेक्ट्रिक चार्जिंग थांबे प्रत्येक पेट्रोल पंपाजवळ उभारावेत जेणेकरून वाहनचालकांचा वेळ व पैसा वाचेल. सध्या सीएनजी गॅस प्रणाली आणि इलेक्ट्रिक चार्जिंगची सोय असलेल्या ठिकाणी गॅस आणि चार्जिंग करण्यासाठी झुंबड उडते. तासन्तास ताटकळत उभे राहावे लागते. सीएनजी गॅस प्रणाली आणि इलेक्ट्रिक चार्जिंग याचा विस्तार झपाट्याने वाढवला पाहिजे तरच इंधनाची, वेळेची आणि पैशाची बचत होऊन प्रदूषणापासून मुक्ती मिळेल!

**राजू जाधव,** मांगूर, जि. बेळगांव

## धमाल

**धोक्याची घंटा**

सुरक्षित म्हणावे असे
कोणते क्षेत्र उरले?
सरस्वतीच्या मंदिरालाही
अत्याचाराने घेरले

बलात्काराचे सर्व
विक्रम नराधमांनी मोडले
निष्पाप चिमुरड्यांनाही
सैतानांनी कुठे सोडले?

हेच एक वाक्य येते
हल्ली जनतेच्या ओठी
आडदांडांना संरक्षण
अन् गरिबांना दमदाटी

**ॲड. अनंत खेळकर**
अकोला

## संवाद


### वाढत्या एनपीएला जबाबदार कोण?

नीती आयोगाने मुद्रा कर्जांतर्गत वाढत्या अनुत्पादित मालमत्ता किंवा या योजनेतील बुडीत कर्जांबद्दल चिंता व्यक्त केली आहे. सन २०१५ मध्ये सुरू केलेल्या योजनेनुसार एमएसएमई कोणत्याही तारण न घेता दहा लाख रुपयांचे कर्ज तीन श्रेणीमध्ये घेऊ शकतात. शिशू श्रेणीत ५० हजार रुपयांपर्यंत, किशोर श्रेणीत ५० हजार ते पाच लाखांपर्यंत आणि तरुण श्रेणीत ५ ते १० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज घेता येते. २०२०-२१ हे आर्थिक वर्ष वगळल्यास सरकारी आकडेवारीनुसार आर्थिक वर्ष २०२२-२३ पर्यंत ४१.१६ कोटी मुद्रा कर्ज खात्यांत २२.८९ लाख कोटी रुपयांची कर्जे देण्यात आली. २०१५-१६ मध्ये ही योजना सुरू झाल्यापासून अनुत्पादित मालमत्ता किंवा योजनेतील बुडीत कर्जांच्या रकमेत म्हणजेच एनपीएमध्ये सातत्याने वाढ होत ती ८,५०२ कोटी रुपयांवरून ४०,४५६ कोटी रुपयांवर गेली आहे, तर त्याच दरम्यानच्या काळात एनपीए खात्यांच्या संख्येत २२.५१ टक्के वाढ झाली आहे. एनपीए खात्यांची संख्या जशी वाढत गेली त्याचप्रमाणे एनपीए खात्यांतील रक्कमदेखील वाढत गेली. ज्या बँका आणि पतसंस्था, वित्तीय संस्था यांनी कर्जे उपलब्ध करून दिलीत त्यांना कर्जदार व त्याच्या संबंधीच्या संपूर्ण माहितीअभावी कर्जांची परतफेड करण्यात अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. नीती आयोगाने याचा विचार करून ई-केवायसी, एमएसएमई उद्यम पोर्टलवरून उद्योजकांची आवश्यक असणारी माहिती संकलित करण्याची आणि लघू उद्योजकांच्या पृष्ठभूमीची अचूक माहिती तपासता येईल, अशी यंत्रणा तयार करण्याचे सुचविले आहे. सरकारकडून कोणत्याही प्रकारची कर्जे, अनुदाने जाहीर केली जातात तेव्हा त्यांच्या परतफेड आणि कर्ज घेणाऱ्यांची माहिती सरकारी यंत्रणा अपुरी नोंदणी किंवा नोंदणी न करताच का व कशा दिल्या जातात, अशा प्रकारच्या शंका निर्माण होतात. त्यांच्यावर योजनांचे उद्दिष्ट्य पूर्ण करण्याचे दडपण येत असण्याचे कारण असते का? अशा परिस्थितीत जाहीर करण्यात आलेल्या योजनांमध्ये भ्रष्टाचाराच्या शक्यता नाकारता येत नाहीत. एनपीएमध्ये सातत्याने वाढ होत असण्यामागे कर्ज आणि त्यांचे हप्त्याहप्त्याने परतफेड न करण्याच्या किंवा परतफेडीत दिरंगाई करून कर्जे न फेडण्याकडे कर्ज घेणाऱ्यांचा जास्त कल असतो हे स्पष्टपणे दिसून येते. सर्वसामान्य जनतेवर अनेक प्रकारचे कर लादून संकलित केलेला पैसा राजकीय नेत्यांकडून त्यांच्या वैयक्तिक प्रसिद्धीसाठी वापरला जातो हा करदात्यांवर होणारा अन्यायच नव्हे काय! असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. आपल्या लोकप्रियतेत भर घालण्यासाठी काही लाखभर उद्योजकांना प्रोत्साहनपर कर्जे उपलब्ध करून योजनांची घोषणा केली जाते; मात्र त्या कर्जांची परतफेड करण्यासाठी पुढाकार घ्यायचे सर्वांकडून टाळले जाते. करदात्यांवर कायद्याची बंधने लादली जातात. करदाते मुकाट्याने कर भरतच राहातात. वास्तविक अशा अन्यायकारक नियमांवर जनतेनेच जाब विचारण्याची गरज आहे; परंतु तसे जोवर होत नाही तोवर कर, करांचा बोजा, कर्ज काढून ते बुडविणे हे सारे अखंडपणे सुरू राहणार आहे हे स्पष्ट आहे.

**स्नेहा राज,**
मो. नं.: ९९६७०१५८९९

## गुल्लेर

# जमवा म्हना तेवढं!



नरेंद्र इंगळे
9561226572

'काय हुसकून राह्यले दादाभाऊ?'

'कोट पाह्यतो लग्नातला.'

'कुठी चालले कोट घालून?'

'कोट इकतो एखांद्याले.'

'जुना कोट कोन घेते हो?'

'घेनारे तयार आहेत. मोदीचा कोट चार कोटीले गेला म्हनतात.'

'तो पंतप्रधानाचा कोट हाय.. तुमचा कोट शंभरात कोनी घेत नाही.. वापरेल माल कोनी घेत नसते.'

'मोदीचा कोट वापरेलच होता.. सुरतच्या व्यापाऱ्यानं घेतला म्हनतात.'

'तो व्यापारी काय करीन कोटाचं?'

'काचाच्या पेटीत ठेऊन देईन.. पुढे भाव वाढला की इकून टाकीन. शेवटी व्यापारी आहे तो.'

'सापडला गळ्या कोट. पेटीच्या बुडात होता. दहा वर्ष झाले. लग्नात सत्यनारायन झाला अन् तसाच ठेऊन देला.'

'याच्यावरचा फूलपँड?'

'फूलपँड फाटला.. लय वापरला होता.'

'या कोटाले कोन घेते?'

'सुरतच्या व्यापाऱ्याले दाखून पाहू.'

'तो दरवाज्यात उभाही करत नाही.. आपलं तोंड पाहूनच हुसकून देते.. तो हायफाय मानसाचे कोट घेते.. आपल्यासारख्या सडकछाप मानसाचे घेते काय?'

'दाखून पाहाले काय हरकत आहे.'

'काही तिकीटाचा खर्च करु नका.. लोकं मानूस पाहून वस्तू इकत घेतात. मोदीनं फाटकी चप्पल इकऱ्या काढली तरी वीस लाखात जाते.'

'मोदीले म्हना जुने पुराने कपडे आमाले देत जा.. जुने जाकीट देत जा.. तो बुवा रोज जाकीट बदलते. त्याहिचे कपडे आपून हर्रास करत जाऊ..आमची दलींदरी जाईन.. नाहीतरी भारतात सुशिक्षित बेकार लय आहेत.. त्याहिले रोजगार भेटते.'

'हे बरोबर बोलले तुम्ही.'

'तेच म्हनतो.. मोदीचं घड्याळ तीस-चाळीस लाखाले जाते.. बनॅन पाच लाखाले.. भक्त लय आहेत आपल्या देशात.. मोदीच्या घरची पायपुसनी पाच लाखात घेतात. अदीक काय सांगाव!'

# हिवरा-कोथरुळ रस्त्याची लागली वाट

**सवाल** | एका साठी दुसऱ्याचा खराबा

सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी
माजलगाव तालुक्यातील जिवनापूर – साळेगाव–पिंप्री ह्या होत असलेल्या रस्ता कामासाठी मुरुम अस्तरीकरण सुरु आहे . पंरतु ह्या मुरुम अस्तरीकरणाने नवीन रस्ता चांगला होत असला तरी त्यासाठी ज्या रस्त्यावरुन मुरुमाची होत असलेल्या वाहतूकीने कोथरुळ– हिवरा रस्त्याची पार वाट लावली आहे . सदरील पाच किमीचा रस्ता हायवाच्या वाहतूकीने खचला असुन उखरला आहे ,दबला आहे,मोठी खड्डे पडले आहेत. आता ह्या रस्त्यावर पावसाचे पाणी साचत आहे . सदरील रस्ता मुरुमाच्या हायवा वाहतुकीने इतका खराब झाला आहे कि आता यावरुन रहदारी करणे आवघड झाले आहे. रस्ता खराब होत असल्याचे हायवा चालक,मालक यांना माहित असतांना सुद्धा पर्यायी रस्त्याचा वापर केला जात नाही. हा रस्ता खराबीला मुरुम वाहतूक जबाबदार आहे.



### जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने लक्ष द्यावे

दररोज होत असलेल्या मुरुमाच्या हायवा वाहतूकीने रस्त्याची खराबी झाली आहे . सदरील रस्ता बीड जिल्हा परिषदेच्या अंतर्गत येतो . ज्या वाहतूकिने रस्ता खराब झाला आहे त्यांना पर्यायी मार्गाचा अवलंब करण्याच्या सुचना द्याव्यात व ह्या रस्त्याचे काम ज्या गुत्तेदाराने केले आहे त्यांना रस्त्याची डागडूजी करण्यास सांगावे. अशी मागणी होत आहे .

## कृषी महोत्सव नव्हता तर सरकारचा सत्ता महोत्सव

**मोहन गुंड :** शेतकऱ्यांच्या आत्महत्या संदर्भात भ्र शब्द नाही!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी
बीड जिल्ह्यामध्ये परळी तालुक्यात परवा दरवर्षी प्रमाणे याही वर्षी कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.बीड जिल्हा हा महाराष्ट्रमध्ये आत्महत्या करणारा जिल्हा म्हणून ओळख असणाऱ्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आधार देण्यासारखा भ्र शब्द मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री,पालकमंत्र्यांनी आत्महत्याबाबद काढला नाही कार्ड नाही.या कार्यक्रमात मात्र कृषी महोत्सवाचे प्रदर्शन कमी आणि राजकीय शक्ती प्रदर्शनास मोठ्या प्रमाणावर केल्याचा आरोप शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड यांनी केला.

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबताना दिसत नाहीत सुदैवाने बीड जिल्ह्याला पालकमंत्री पद मिळाले मात्र या काळामध्ये शेतकऱ्याच्या आत्महत्या थांबवण्यात यासाठी एक साधा प्रयत्न केल्याचा दिसत नाही.परळी मध्ये परवा



कृषीमत्सवाच्या निमित्ताने मुख्य मंत्री,उपमुख्यमंत्री,पालकमंत्री,आणि इतर लोकप्रतिनिधींचे मोठमोठे होल्डिंग सजावट जवळपास एक फोल्डिंगचा खर्च ३० ते ३५ हाजाराचा खर्च असून या कृषी महोत्सवावर लाखो रुपयची उधळपट्टी कशासाठी ? आज जिल्ह्यातील पिक विमा मिळत,बँका कर्जासाठी दारात उभ्या करत नाहीत,अनेक फळबागाच्या अनुदानाचे विषय पान २ वर...

## सोयगाव तहसीलवर धडकला मोर्चा

**आक्रमक:** प्रशासनास मागण्यांचे निवेदन

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी
भारतीय मजदूर युनियन शी संलग्न असलेल्या लाल बावटा शेतमजूर युनियन व भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने शुक्रवारी (ता.२३)सोयगाव तहसील कार्यालयावर शेतमजूर, ग्रामीण कष्टकरी, निराधार,बेघर व भूमीहीन रोहयो मजूरांचा धडक मोर्चा सोयगाव तहसील कार्यालयावर काढण्यात आला व तहसीलदारांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.मोर्चेकरांनी गायरान जमीनीचे पट्टे नावावर करा, वनजमीनीचे पट्टे नावावर करा,सर्व अतिक्रमणे नियमित करा,राशनवरील धान्य अदा करा,राशनच्या बदल्यात पैसे देण्याची पध्दत बंद करा, भिल्ल तडवीना एसटी प्रमाण पत्रे अदा करा, वृध्दांना ३ हजार पेन्शन द्या,रोहयोचे किमान ७०० रूपये वेतन द्या,घरकुलासाठी ५ लाख रूपये अनुदान द्या, दरमहा २ हजार रूपये




निराधार अनुदान द्या,आदी विविध मागण्यांचे निवेदन नायब तहसीलदार शिवाजी थोटे यांना देण्यात आले.


शहरातील शिवाजी चौकापासून सुरू झालेल्या या मोर्चात सोयगाव तालुक्यातील सुमारे ३०० शेतमजूर,रोहयो मजूर, भूमीहीन, गायरान धारक, निराधार, ग्रामीण कष्टकरी स्त्री पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मोर्चाचे नेतृत्व भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सहसचिव पान २ वर...

## मानवतावादी कवी संमेलनाचे आयोजन

**चंद्रप्रकाश शिंदे:** साहित्य सम्राट महोत्सवानिमित्त उपक्रम

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी
जीवन प्रणाली प्रतिष्ठान महाराष्ट्र संचलित मानव प्रतिष्ठा सृजनता साहित्य परिषदेद्वारा, साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमीत्त राज्यस्तरीय मानवतावादी कवि संमेलनाचे आयोजन (दि. २५) ऑगस्ट रोजी महात्मा फुले सभागृह डॉ. आंबेडकर लॉ कॉलेज नागसेनवन छ. संभाजीनगर येथे दुपारी १ ते ४ या वेळेत आयोजित केलेले आहे.कविसंमेलनाचे उद्घाटक धिमान प्रा. डॉ. धोंडोपंत मानवतकर सुप्रसिद्ध साहित्यिक (मंठा) हे असून उद्घाटन सत्राचे अध्यक्ष धिमान भिमराव सरवदे, (उपाध्यक्ष–मा.प्र.सृ.सा.प. महा), सुत्रसंचालन प्रा. डॉ. चंद्रकांत साळवे (संघटक मा.प्र.सृ.सा.प. महा.), प्रस्ताविक धिमान प्रा. डॉ. कोंडबा हटकर (सहसचिव मा.प्र.सू.सा.प. महा.) हे करणार आहेत.

राज्यस्तरीय मानवतावादी कवी संमेलनाचे



अध्यक्ष धिमान राजू वाघमारे (सहसचिव मा.प्र.सृ.सा.प. महा.) हे राहणार असून सुत्रसंचालन धिमान प्रोफेसर डॉ. विठ्ठल स.जाधव (कोषाध्यक्ष मा.प्र.सृ.सा.प. महा.) तर आभार प्रदर्शन धिमान धन्यकुमार टिळक सर (सदस्य मा.प्र.सृ.सा.प. महा.) हे करणार आहेत.मानवातावादी कविसंमेलनात महाराष्ट्रातील नामवंत कविवर्य ,धिमान चंद्रकांत वडमारे (अंबेजोगाई), धिमान छगन घोडके (लातूर), धिमान संजीवजी कांबळे (बीड), धिमान आनंद चोपडे (बेळगाव), धिमान नामवंत प्रभे (अमरावती), धिमान योगिराज कोचाडे (हिंगणघाट वर्धा), धिमान देविलाल रैराळे (अमरावती), धिमान डॉ. नंदकिशोर दामोधरे (अमरावती), धिमान सिद्धार्थ प्रधान (परभणी), धिमान प्रा. आरुण कांबळे बनपुरीकर (सांगली), धिमान विद्याधर पांडे (अंबाजोगाई), धिमान सुभाष वाघमारे (वालचंद नगर), धिमानउत्तम कराळे (नाशिक), धिमान प्रा. डॉ. पांडुरंग सुतार (बीड), धिमान प्रताप मोरे (बीड), धिमती रंजना गायकवाड (अहमदपुर जि. लातूर), धिमान प्रा. देवानंद पवार (छत्रपती संभाजीनगर), धिमान सुजित कांबळे (सांगली) पान २ वर...



## पैठण तालुक्यात जोरदार अतिवृष्टी

**अस्मानी:** पाझर तलाव फुटल्याने शेतकऱ्याचे नुकसान

पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी
पैठण तालुक्यात शुक्रवारी रोजी विविध महसूल मंडळात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाल्यामुळे गेवराई मर्दा येथील पाझर तलाव फुटून शेतकऱ्यांच्या शेतीतील लाखो रुपयांचे पिकाची नुकसान झाले असून नुकसानाची पाहणी व पंचनामा करण्याचे तातडीने आदेश तहसीलदार सारंग चव्हाण यांनी संबंधित गावाचे मंडळ अधिकारी व तलाठी यांना दिले आहे. शुक्रवारी रोजी दुपारपासूनच पैठण तालुक्यातील बिडकीन, पाचोड, बालानगर, कडेठाण, गेवराई मर्दा यासह अनेक परिसरात जोरदार पाऊस पडला असून पावसाची संततधार आजही शनिवार रोजी दुपारी कायम सुरू होती. या पावसामुळे गेवराई मर्दा परिसरातील पाझर तलाव पान २ वर...

## ...अन्यथा ऑफलाईन तक्रारी घ्याव्यात

**ॲड.नारायण गोले:** अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान




माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी
बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात नित्रुड, दिंद्रुडसह इतर काही महसूल मंडळात अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या सोयाबीन, कापूस, तूर, उडीद आदी पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून नुकसानीबाबत सरसकट २५% अग्रीम देणे आवश्यक असताना विमा कंपनी व सरकारने याबाबत अद्याप निर्णय न घेतल्यामुळे शेतकरी कामगार पक्ष आक्रमक झाला असून शेतकऱ्याचे नुकसान टाळण्यासाठी व विमा भरणाऱ्या शेतकऱ्यांना अतिवृष्टी झालेल्या महसूल मंडळातील शेतकऱ्यांच्या नुकसानीबाबत शेतकऱ्यांना विमा कंपनीकडे तक्रारी करण्यासाठी ऑनलाईन प बंद असून, सरोवर डाऊन असल्याचे कारण समोर येत आहे अशावेळी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना ७२ तासाच्या आत तक्रार दाखल करणे बंधनकारक असल्यामुळे विमा कंपनीसह कृषी विभागाने पान २ वर...

## नराधमांना बंदुकीने गोळ्या घालून ठार करा

**निवेदन :** सरकारकडे रोहन गलांडे पाटील यांची मागणी

केज/पुण्यभूमी प्रतीनिधी
केज तालुक्यातु बदलापुर येथील झालेल्या चिमुरडीवर अत्याचार करणाऱ्या नराधमांना फाशीची शिक्षा देण्यात यावी तसेच कोलकत्ता येथील हॉस्पीटलमध्ये नर्सवर झालेल्या अत्याचार व अशा प्रकारच्या अत्याचार , बलात्कार, छेडछाड, महीलांना जिवे मारणाऱ्या, नराधमांची संख्या भारतात , राज्यात वाढत जात आहे तरी असा प्रकार केल्यास नराधमाला बंदुकीच्या गोळ्या घालून जागीच मारण्यात यावे अशी विनंती केंद्र व राज्य शासनाला निवेदनाद्वारे अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील यांनी केली आहे या विषयी निवेदनाद्वारे सविस्तर वृत्त असे की तहसिलदार साहेब केज यांच्या मार्फत केंद्र व राज्य शासनाला रोहन गलांडे पाटील (अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य केज तालुकाध्यक्ष) निवेदनाद्वारे




विनंती करतो की बदलापुर येथील झालेल्या चिमुरडीवर अत्याचार करणाऱ्या नराधमांना फाशीची शिक्षा देण्यात यावी तसेच कोलकत्ता येथील हॉस्पीटलमध्ये नर्सवर झालेल्या अत्याचार व अशा प्रकारच्या अत्याचार , बलात्कार, छेडछाड, महीलांना जिवे पान २ वर...

**परळी बीड मार्ग बंद** | प्रवाशांना अडचणींचा सामना

# महामार्गावरचा पर्यायी पूल गेला वाहून

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी परळी–सिरसाळा– बीड कमी अंतराचा तेलगाव मार्गे बीड या रस्त्यावर पुलाची कामे सुरू आहेत नदीपात्रात भराव टाकून केलेला तात्पुरता पूल काल झालेल्या मुसळधार पावसाने वाहून गेला आहे. त्यामुळे परळी मार्गे बीड जाणाऱ्या वाहनांची मोठी अडचण निर्माण झाली आहे. पावसाळ्यापूर्वी या रस्त्यावरील पुलांची कामे पूर्ण होणे आवश्यक असतानाही ही कामे रेंगाळत राहिली. मात्र आज (शनिवार) पहाटेच्या सुमारास परळी–बीड रस्त्यावरील पांगरी जवळील नदीपात्रात भराव टाकून केलेला पर्यायी पूल पाण्याने वाहून गेला. त्यामुळे परळी– बीड मार्गावरील वाहतूक पूर्णतः बंद झाली आहे.

परळी बीड राज्य रस्त्यावर सध्या रस्त्यांची कामे सुरू आहेत. परळी तालुक्यातील पान २ वर...




### अधिकच्या डिझेल पेट्रोलचा खर्च

नदीपात्रातील पाण्याचा प्रवाह कमी झाल्याशिवाय तात्पुरत्या पुलाचे काम करता येणार नाही त्यामुळे आता पाण्याचा प्रवाह कमी होण्याची वाट पाहिल्याशिवाय पर्याय नाही तोपर्यंत मात्र परळी बीड हा मार्ग वाहतुकीसाठी बंद राहू शकतो, पर्यायी पूल तयार झाल्यानंतरच हा रस्ता सिरसाळा– बीडकडे जाण्यासाठी तयार होणार आहे. तोपर्यंत मात्र वाहनधारकांना दुसऱ्या अंबाजोगाई मार्गाचा वापर करावा लागेल आणि ते अंतरही अधिक असून अधिकच्या डिझेल पेट्रोलचा खर्च वाढणार आहे.

## बीडची गावे अंबाजोगाईकडे हस्तांतरित

**चर्चा:** आ.नमितांचा निघाल्या भलत्याच करामती

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी
केज मतदार मुंदडा यांच्या माध्यमातून त्यांचे पती व सासरे यांनी सुळबुध्दीचे राजकारण सुरू केले असून विरुद्ध असलेल्यांना त्रास देण्याचा ते सातत्याने प्रयत्न करत आहे. याचे ताजे उदाहरण म्हणजे सार्वजनिक बांधकाम विभाग बीड मध्ये असलेल्या केज मतदार संघातील बीड तालुक्यातील नेकनूर, येळंबघाट, सफेपुर, अंधापुरी, खडकीघाट सह ९० गावांना सा. बा. विभाग अंबाजोगाई ला जोडुन अंबाजोगाईच्या अधिकाऱ्यांना दबावाखाली घेऊन इतर पक्षातील व विरोधकांची अडवणूक करण्यासाठी हा सर्व खटाटोप मुंदडा कुटुंबीयांकडून सुरू असून आ. नमिता मुंदडांच्या या कृतीचा बीड तालुक्यातील सर्वच गावातील ग्रामस्थांनी एका पत्रकाद्वारे तिव्र



शब्दात निषेध केला असून या प्रकरणी आ. नमिता मुंदडा च्या विरुद्ध संताप व्यक्त करून आंदोलन करण्याचे तयारी आहे.

संघात आ. नमिता निवडणूकीत त्यांच्या केज मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी केज मतदार संघातील बीड तालुक्यातील गावांच्या परिसरातील सर्व लेखाशिर्षातील कामे सा.या विभाग अंबाजोगाई यांचे कडे हस्तांतरित करणे बाबत अधिक्षक अभियंता बांधकाम मंडळ उस्मानाबाद यांना पत्र दिले होते त्यानुसार अधिक्षक अभियंता यांनी बीड तालुक्यातील नेकनूर, येळंबघाट, सफेपुर, अंधापुरी, खडकीघाट सह १० गावाला केज मतदार संघातील सर्वच गावांनाही सा. वा विभाग बीड ऐवजी पान २ वर...